# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २८/०५/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २८/०५/२०१० रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. २१/०५/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ४) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ५) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ६) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ८) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १०) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| ११) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १२) | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १३) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| २) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, स्थायी समितीचे सर्व सदस्य, महानगरपालिकेचे उपायुक्त, सचिव साहेब, तसेच अधिकारी वर्ग या सर्वांचे स्वागत. सचिव साहेबांनी सभेला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २८/०५/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. २१/०५/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. प्रकरण २ मधला 'क' चा प्रस्ताव सादर करायचा आहे तर विषय पत्रिकेचे विषय संपल्यानतंर सभागृहाच्या मान्यतेने हा विषय घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

आपल्या विषय पत्रिकेतील विषय संपल्यानंतर हा विषय घेण्यात येईल.

**बर्नड डिमेलो :-**

आपले मा. श्री. वसंत डावखरे हे बिनविरोध निवडून आले आहेत त्याबद्दल मी अभिनंदनचा ठराव मांडतो.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०६ :-**

विधान परिषदेवर श्री. वसंत डावखरे हे बिनविरोध निवडून आले आहेत त्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ९, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**
याच्यावर ठराव केला का?

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**
सदरचा विषय फक्त माहितीसाठी आहे. तर ठरावाची आवश्यकता नाही.

**अनिल सावंत :-**
याच्यामध्ये एप्रिल पासुन दिलेल आहे तर जानेवारी ते मार्च कुठे आहे?

**शरद बेलवटे :-**
मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. ऑडीट डिपार्टमेंटला तपासण्यासाठी दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**
ऑडीटर कुठे आहेत?

**मा. सभापती :-**
ऑडीटर रजेवर आहेत.

**अनिल सावंत :-**
त्यांनी ॲप्लीकेशन दिले का? त्यांना माहित नाही का आज स्टॅण्डींग आहे ती?

**मा. सभापती :-**
ॲप्लीकेशन दिल आहे. ते रजा घेवून गेले.

**अनिल सावंत :-**
आता डिसेंबर पर्यंत घेवून काही फायदा नाही. मा. सभापती साहेब, एप्रिल पासुन लोकल बॉडी टॅक्स जो चालू झाला आहे. आता हा आढावा जमाखर्चाचा आलेला आहे. त्याची २ महिन्यामध्ये काय परिस्थिती आहे? रिकवरी कशी आहे?

**मा. सभापती :-**
समाधानकारक नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**
स्थानिक संस्था कराचे १ एप्रिल पासून अंमलबजावणी सुरु झाली. त्याची फी वसुली आहे ती १ मे पासून होणे अपेक्षित आहे. त्यांनी पैसे भरायचे होते आणि त्यानुसार साधारणतः २५ मे पर्यंत आपल्याकडे २ कोटी ४४ हजार एवढीच वसुली झालेली आहे.

अनिल सावंत :-
आणि आपल्या ऑक्ट्रॉयचे बजेट काय होते?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**
ऑक्ट्रॉयचे बजेट होते ७ को टी ३७ लाख रु.

**अनिल सावंत :-**
२ महिन्याचे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**
फक्त एक महिन्याचे. एप्रिल पेड ईन मे टॅक्स जो आहे तो पुढच्या महिन्यात केव्हाही रिकवर होतो. आधीच्या महिन्यात हात नाही. ७ कोटी ३७ लाख जमा झाले पाहिजे.

**अनिल सावंत :-**
मागच्या स्टॅन्डीगमध्ये सुध्दा मी विषय काढला होता. स्टील ट्रेडर्सचे १२ करोडची आउट स्टॅन्डीग होते. तर त्याच्यामध्ये काय रिकवरी झाली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**
त्यामध्ये २३ लाखाची रिकवरी झाली.

**अनिल सावंत :-**
फक्त एवढच, बस बाकी तुम्ही वे ऑफ करणार आहात की काय करणार आहात?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**
वे ऑफ म्हणजे त्यांचा जो त्यावेळेचा बेसिकली व्यवहार आहे. आता कासं आहे यावेळी त्यांची १०० टक्के वसुली होईल. एकदा ही जी मी आपल्याला जमा सांगितली ज्यातली ८० लक्ष पेक्षा जास्त स्टिलवाल्यांचीच आहेत. आपली करंट आपण १७ फेब्रुवारी पासून नाक्यावर स्टाफ ठेवून त्यांच......

**अनिल सावंत :-**

ते ठिक आहे. रेग्युलर तुम्ही करायचे. जे आऊट स्टॅन्डीग होते त्याचे काय केले? १२ करोड रुपयाचे काय केले?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आऊट स्टॅन्डीगची वसुली झालेली नाही.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये काही प्रोस्टीक्युशन करायचे प्रोव्हीजन लॉ मध्ये असेल ना.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेबांनी स्थायी समितीला अशी माहिती दिली होती की, त्यांच्या गाड्या सिल करा. त्यांच्या गाड्या सिल करणार आहोत.

**अनिल सावंत :-**

त्याच्यावर प्रशासनाने काय कारवाई केली? की, त्यांना पैसे सोडून द्यायचे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

फक्त वसुल होणार आहे, वसुल होणार आहे असे सांगितले. तुमचे बाकी पहिले वसुल झाले पाहिजे ना? कोणाचे बाकीकडे लक्ष नाही आणि त्याच्यावर कुठली चर्चाच होत नाही. फक्त आश्वासन दिली जातात प्रत्येक मिटींगमध्ये की, वसुली करण्यात येईल, वसुली करण्यात येईल. पण कुठे वसुली होते?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मागच्या वर्षाच नाही. पण करंट वसुली जी आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

डाटा नाही तर कुठे आहे? किती बाकी आहे. त्याची माहिती द्याना.

**याकुब कुरेशी :-**

डाटा नाही. तर मग, १२ कोटीची वसुली बाकी आहे अस कोणी सांगितले? आणि ती कसली माहिती आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

१२ कोटी वसुली आहे ती ऑक्ट्रॉयच्या उद्दीष्टानुसार पकडली होती. ऑक्ट्रॉयच १०८ दिवसाच उद्दीष्ट हे साधारणतः २४ कोटी ८ लक्ष ३१ हजार ४६७ रू. एवढं असायला पाहिजे होत. त्याच्या अगेंस्ट आपली झालेली वसुली आहे. १३ कोटी ६४ लक्ष ७१ हजार ३० रू. आणि बाकी आहे १० कोटी ४३ लक्ष ६० हजार ४३७ रू. पण ही १० कोटी ४३ लक्ष ६० हजार ४३७ रू. ही केवळ स्टिल व्यापाऱ्यांकडेच नाही. पण बाकी सर्व म्हणजे होलसेल ट्रेडर पासून आपण त्या वसुली करता गेल्या पाच एक महिन्यात. त्या होलसेल व्यापाऱ्यांच्या मिटींग घेतल्या, स्टिल व्यापाऱ्यांच्या घेतल्या, ज्वेलर्सच्या घेतल्या. त्यांना नोटिसा दिल्या पण, त्यांच्या अगेंस्ट त्यांनी पैसे अजून भरलेले नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्याच्यावर काहीतरी असेल की नाही.

**याकुब कुरेशी :-**

कारवाई काय करणार?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्यावेळी तिथे अधिकारी कोण होते?

**जुबेर इनामदार :-**

आपण त्याच असेंसमेन्ट केल का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यावेळेच त्यांच असेंसमेन्ट केलेले नाही. त्यावेळेच २००८ मध्ये करायला पाहिजे होत. किंवा मॅक्झीमम रि-असेंसमेन्ट जे आहेते २००९ च्या पूर्वाधाला करायला पाहिजे होत. तर ते अजुनपर्यंत......

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यावेळी चव्हाण होते.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कोण आहे. त्यांना इथे बोलवा ना. त्यांनी वसुली का केली का? हा नगरपालिकेचा लॉस आहे ना. असा हलगर्जीपणा करून चालत नकाय? मग, आता सोडून द्यायच का? तुम्ही सांगता सोडून द्या तेवढे पैसे. त्या अधिकाऱ्याला बोलवा. कुठच्याही गोष्टीला तुम्ही प्रेशराईज केल नाही तर कोणी पैसे देणार नाही. कोणी भरणा करणार नाही. कोणी मेहनत घेणार नाही. त्या अधिकाऱ्याला बोलवा. आपण त्यांना कसला पगार देतो.

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, आपल्या अगोदर सेसच बाकी होत त्याबद्दल किती जमा झाले.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यावेळेचे साधारणतः सव्वा दोन कोटी रू. जमा झाले आहे.

**मा. सभापती :-**

आतापर्यंत आपल्याकडे टोटल किती जमा झाले पाहिजे होते. आता आपल्याला २ महिने झाले ना!

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

२ महिने नाही. १ महिना झाला. कारण, वसुली १ मे पासुन सुरू झाली. २० एप्रिल पर्यंत त्यांनी पैसे भरायचे नव्हते. त्याची जी आवक आहे. त्याचा जमा त्याचा एल.बी.टी. चा देय होतो हा त्यांनी १ मे पासून द्यायचा असतो.

**मा. सभापती :-**

महाराष्ट्र शासनाने आपल्याकडे......

**जुबेर इनामदार :-**

आपण ऑक्ट्रॉय कधी विड्रॉ केला?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

३१ मार्च २००९ पासून ऑक्ट्रॉय विड्रॉ केला?

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, आता आपल्याला किती महिने झाले.

**जुबेर इनामदार :-**

एप्रिलचा पूर्ण गॅप झाला. म्हणजे फुकट आपण मे च्या पहिल्या तारखेपासून गृहित धरू. महाराष्ट्र राज्य मध्ये सेल्स टॅक्सची जी प्रथा होती आता वॅट आला. सेल्स टॅक्समध्ये असेसमेन्टची पध्दत असायची. नेक्स्ट इअर त्याचा असेसमेन्ट व्हायच आणि त्या ताळेबंद खातेच्या माध्यमातुन ॲक्जेटची त्याने किती बिझनेस केला आहे. आणि त्याचा सेल्स टॅक्स किती होईल. हा असेंसमेन्ट अमाऊंट त्याच्यामध्ये टी.डी.एस. किती ॲक्स्ट्रा ॲडीशनच असेल किंवा  दुसरे जे काही चार्जेस असतील त्या अनुषंगाने ते काढत असेल. आपल्याकडे अशा व्यापाराने सेसच लायसेन्स घेतला होता. ज्याच असेसमेन्ट सुरू केल का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

असेसमेन्ट म्हणजे त्याने सेल्स असेसमेन्ट करून त्यांनी सादर करायच आहे. आता सध्या आपल्या कायद्यातली जी प्रोव्हीजन आहे नियमामधली ती सहा महिन्याची आणि एक वर्षाची असेसमेन्टची आहे. म्हणजे त्यांनी सहा महिन्याने असेसमेन्ट दाखल करायचा.

**जुबेर इनामदार :-**

एल.बी.टी.च बोलताय. मी सेसबद्दल बोलतो. एल.बी.टी. तर आपण आता सुरू केली. सेस भाग पण तुमचाच आहे ना. खतगांवकर साहेब होते व्यक्ती बदलला विभाग बदलला नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

विभाग नाही बदलला मान्य करतो ना.

**जुबेर इनामदार :-**

आता खतगांवकर साहेबांच्या जागेवर तुम्ही आला आहात. जो काही बॅकलॉक असेल त्याच्यात सुधारणा करायची किंवा वसुली करायच काम तुमचच आहे. तर त्याच्याकरिता तुम्ही नियोजन काय केल?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आहेत. आपल्याकडे आता जो डाटा अहे. ज्या डाटापैकी ज्यांनी ज्यांनी सेस भरलेला अहे. तो मालाचा आपल्याकडे रेकॉर्ड आहे. त्या व्यतिरिक्त ज्यांनी कोणी भरलेला नाही त्यांना आपण नोटिस पाठवू.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपण आता सेस कोणाकडून घेणार? ज्यांनी आपल्याकडे रजिस्ट्रेशन केल होत नोंदणी केली होती त्याच्याकडून आणि जे शिल्लक होते त्यांत असेसमेन्ट कधी सुरू करतात. असेसमेन्ट सुरू केल की तुमच्यासमोर ॲक्जेटली अमाऊंट येईल. ॲझ इट इझ, वेअर इट इझ जो अमाऊंट येईल तो १० कोटी असु शकतो. १५ कोटी असु शकतो. ५ कोटी ही असु शकतो. ते तुमच्यासमोर स्पष्ट होईल ना.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

साहेब, त्याच्यामध्ये अस आहे की, जी असेसमेन्ट करायची आहे ती आपली २ तऱ्हेची आहे. एकतर फिजिकल असेसमेन्ट स्पॉट वर जावून करायची आहे. ती फिजिकल असेसमेन्ट सेस बंद झाला. १८ डिसेंबरला. तर १८ डिसेंवर नंतर इमिजिएटली करायला पाहिजे ती जानेवारी महिन्यात २००९ आणि दुसरी अकाऊंट बेस्ट असेसमेन्ट आहे की, तुम्ही मला १ सप्टेंबर २००८ ते १८ डिसेंबर २००८ चा अकाऊंट दाखवा. आता ह्याच्यामध्ये जे महत्वाचे ॲक्सेसी आहेत स्टिल पाट्यावाले या स्टिल पाट्यावाल्यांकडे रेकॉर्ड नाही. कुठल्याही तऱ्हेचा रेकॉर्ड नाही. कुठल्याही तऱ्हेचा ते टॅक्स भरत नाही. त्यांचा व्यवहार हा फक्त चिठ्ठीवर चालतो. त्याच्यामुळे.......

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी सेस बुडवला, सरकारचा पैसा बुडवला, ॲक्सेस बुडवला. त्यांच्यावर गुन्हा दाखल करा. राऊत साहेब माझ म्हणण स्पष्ट आहे. एल.बी.टी. तुम्हा आता सुरू केली त्या विषयाबद्दल आपण नंतर बोलू. सेसचा

जो बॅकलॉक आहे. त्या लोकांनी सेसच रजिस्ट्रेशन केल. त्यांच असेसमेन्ट आपण कधी सुरू करणार? त्यावेळी किती लोकांनी सेसच रजिस्ट्रेशन केल होत? किती नोंदण्या झाल्या होत्या?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

१० हजार नोंदण्या झाल्या होत्या.

**जुबेर इनामदार :-**

१० हजार लोकांचा तुम्हाला असेसमेन्ट कराव लागेल. फक्त स्टिल आणि पाट्यावालांच करून थोडी चालणार आहे. पानपट्टीवाला असला तरी त्याच तुम्हाला कराव लागणार आहे. त्यांनी ऑक्ट्रॉय नाही भरले. त्यांनी सेस भरायचा. कारण तेव्हा ऑक्ट्रॉय नव्हता. पण त्याचे असेसमेन्टच काय?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

आम्ही ते असेसमेन्ट करून घेवू.

**जुबेर इनामदार :-**

हे नेहमीच उत्तर असत करून घेवू.

**याकुब कुरेशी :-**

ठेकेदार ऑक्ट्रॉय जो वसुल करायचा त्याच्यापेक्षा जास्त अधिकार आपल्याला आहे. मग, तो एवढा वसुली करायचा आपल्याला पैसे द्यायचा किंवा पैसे यायचे. आणि आपल्याकडे जास्त अधिकार असून सुध्दा आपण लॉसमध्ये जातो त्याच कारण काय?

**जुबेर इनामदार :-**

जाणुन-बुजून म्हणजे ऑक्ट्रॉय परत आणायचा आहे किंवा जाणुन-बुजून.........

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

जाणुन-बुजून ऑक्ट्रॉय परत आणण्याच हे नाही. शासनाने सांगितल सेस वसुल करा. सेस वसुल करायला सर्वात प्रथम आपणच डिसीजन घेतला होता. आणि त्याच्यानंतर सेसची जी वसुली आहे. ही ऑक्ट्रायच्या प्रकारे झाली नाही. कारण सेस किंवा एल.बी.टी. हे दोन्ही अकाऊंट बेस आहे. जे अकाऊंट ठेवतात त्यांचे असेसमेन्ट होवू शकते. आणि त्यांच कुठेतरी रिलेटेड पेमेन्ट असत वॅटच असत. इनकम टॅक्सच असत, कॉर्पोरट टॅक्सच असत. सेन्ट्रल एक्साईटच असत, स्टेट एक्साइसच असत या सर्व टॅक्सशी रिलेट करून आपण त्यांचे असेसमेन्ट करू शकतो. भले त्यांनी आपले असेसमेन्टचे रिपोर्ट सादर केले नाही. परंतु, सेसच्या बाबतीमध्ये अशा तऱ्हेचा जो डाटा आहे. हा डाटा कलेक्ट केला गेला नव्हता.

**जुबेर इनामदार :-**

अस नका करू. असेसमेन्ट सुरू कराना. विषय संपला, सेस संपला आता एल.बी.टी. आल. बॅकलॉक चा आपण विचार करतो तर आपल कस रिकवरी होईल. झालेली रिकवरी महापालिकेला कुठेतरी त्याचा आर्थिक फायदाच आहे. व्ही आर रिकव्हरी पार्ट याच्याकरिता आपण काय करणार? धोरणात्मक काय निर्णय घेणार? किंवा काय धोरण ठरवता ते महत्वाच आहे. आणि एवढ्या दिवसामध्ये ठरवल का नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब आम्ही फक्त मिटिंगमध्ये बोंबाबोंब करायची.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

तस काही नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आतापर्यंत सर्व तेच झाले आहे. सर्व सदस्यांनी बोंबाबोंब करायची आणि त्याचा निष्कर्ष काही निघत नाही. तुम्हीच सांगा रिकवरी कधी पासून चालले. आऊट स्टॅण्डींग बद्दल किती वेळा चर्चा झाली? त्याच्यात प्रगती काय झाले? आता शेवटी ते पूर्ण होईल आणि तुम्ही सांगतात की, तो विभागीय कोणी अधिकारी आहे त्यांना इथे बोलवा त्याची वसूली का नाही झाली? मग, आपण त्यांना फुकटचे पगार देतो? आमचा त्यांच्यावर आक्षेप आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त):-**

साहेब, तो विषय नाही. १८ जण वेगवेगळे आहे. तो विभाग प्रमुख झाला.

**चंद्रकांत म्हात्रे:-**

त्याच्यावर दबाव असल्याशिवाय काही होणार नाही.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त):-**

आपण सेस वसुल करण्यासाठी १८ गट पाडले होते. १८ गटाचा प्रत्येक नियंत्रण अधिकारी आहे. तर सगळे जण जबाबदार आहे.

**चंद्रकांत म्हात्रे:-**

साहेब, मला काय म्हणायचं आहे की, तुम्हाला कोणाला तरी जबाबदार धरावचं लागेल. तुम्ही जर प्रत्येकाला असच लूज सोडल तर कस चालेल? आम्ही सदस्यांनी कारवाई काय करायची. आमचे वरिष्ट पण आम्हाला विचारतात ना की, तुम्ही तिथे काय विचारल?

**जूबेर इनामदारः-**

तुम्ही अस कस उत्तर देता ते लोक जबाबदार. शेवटी प्रशासनचं झाल ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पानपट्टे साहेब, १८ लोक जबाबदार आहे तर आपण प्रमुख कशाला नेमतो? मग प्रमुख नेमायची गरजच काय?

**मा. सभापतीः-**

पानपट्टे साहेब, ते १८ प्रमुख विभाग व्हाईज कोण आहे? तर त्यांना इथे बोलवा ना. त्या १८ जणांची जबाबदारी आहे.

**चंद्रकांत म्हात्रेः-**

मा. सभापती साहेब, राऊत साहेब रेल्वेमध्ये टिकीट कलेक्टर आहे. त्यांना अस असत की, तुमचे एवढे रिक्वायरी पाहीजेच. ते रिक्वायरी करतात. तुम्ही यांच्या बद्दल का करत नाही की, तुमची एवढी रिक्वायरी झाली पाहिजे.

**प्रविण पाटीलः-**

मा. सभापती साहेब हा विषय एवढा महत्वाचा आहे. मुळात हा विषय आज जमा खर्चाच्या विषयामध्ये निघाला ॲक्च्यूली हा विषय आपण स्वातंत्र्य विषय घेऊन बोलायला पाहिजे होतं. कारण जमा खर्च मध्ये हा विषय आलेला आहे. रिकवरी भाग हा महापालिकेच्या दृष्टीकोनातून फार महत्वाचा विषय आहे. तर आपल्याला विनंती आहे की, हया विषयावर प्रत्येक विभागप्रमुख किंवा जो संबंधित अधिकारी आहे त्यांना बोलवून मा. महासभेमध्ये किंवा स्थायी समितीमध्ये हा विषय तुम्ही घ्या. कारण जमत नसेल तर कारण काय की कुठचही काम करायला गेलो ना की, सगळं त्याच्यावरच येत. आमच्याकडे पैसेच जमा नाही.

**अनिल सावंतः-**

मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेब, ज्यावेळी महाराष्ट्र स्टेट ने सेस इंन्ट्रोडयूस केल. डीफॉल्ट च प्रोस्ट्रीकेशन करायचे काय अधिकार तुम्हाला दिले?

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

डिफॉल्टर वर प्रोसिक्यूशन करायचे ते अधिकार आहे. ते कलम २५२"एल" प्रमाणे होते.

**अनिल सावंतः-**

म्हणजे तुम्ही प्रोसिक्यूशन करु शकता आणि असेसमेंटने प्रोव्हिजन काय दिलेली आहे?

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

असेसमेन्ट चे फिजिकल त्यांच अकांउंट बुक चेक करुन असेसमेन्ट करायचं होत.

**अनिल सावंतः-**

समजा त्यांनी फिजिकल रेकॉर्ड दिला नाही तर एक्स पार्टी करुन तुम्ही प्रोव्हिजनल असेसमेन्ट करु शकता ना.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

त्याच्यामध्ये समिलर प्रोव्हिजन जी आहे आपले सेस का एल.बि.टी. या दोघांचे आपण जर नियम पाहीले तर त्या नियमामध्ये आणि व्हॅटच्या नियमामध्ये जर तुलना केली तर काही त्रुटी महत्वाच्या आढळतात. ते मी आता आपल्याला सांगू इच्छितो. व्हॅटमध्ये बेस्ट असेसमेंट नावाची टर्मिनॉलॉजी आहे. जर मला ही व्यापा-याची असेसमेन्ट पटली नाही. तर माझ्या वतीने मी काय करु शकतो. ती असेसमेन्ट करायला पाहीजे. सेसच्या काही प्रमाणात ती केली होती. जशी ऑक्ट्रॉय मध्ये सुध्दा करतो. उदा. स्टीलच्या पाटयावाले ४०-४५ रु. किलो ने स्टिल ची आयात करतात, पण आता ऑन गोईंग मार्केट रेट आहे ८० रु. जर जो होलसेल मार्केट रेट आहे त्याचप्रमाणे आपण त्याचा असेस्टकरुन पावती फाडायला लावतो. किंबहूना अशा पध्दतीचा आपण एल.बी.टी. मध्ये करणार आहोत त्यांनी ऑलरेडी पैसे भरले पण ते पैसे भरलेले योग्य नसतील अस आढळल तर आपण त्याला रि-असेसमेंटची नोटीस देऊ शकतो. आणि रि-असेसमेंटची नोटीस दिल्यानंतर त्याची एक प्रोसिजर आहे. आता ऑक्ट्रॉयचं, एल.बी.टी किंवा सेसच अत्यंत महत्वाच वेळ काढू अशी प्रोसिजर आहे. प्रत्येक ठिकाणी तुम्हाला त्यांना नोटीसा द्याव्या लागतात. हीअरींग द्याव लागतं. हीअरींग देऊन समोर बोलवाव लागतं. समोर बोलवून त्यांना पैसे भरण्यासाठी परत त्यांना डिमांन्ड नोटीस द्यावी लागते. डीमांड नोटीस ला पिरेड द्यावा लागतो. डीमांड नोटीस च्या पिरेड प्रमाणे ती रिकवरी झाली नाही तरच मग पुढची कारवाई सुरु होते. याच्यामध्ये समरी कारवाई कुठलीच नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्ही आता बोलले की, कमिश्नर साहेबांबरोबर या पाटयावाल्यांच्या ब-याच मिटींग झाल्या. ते १० करोड रु. च जे आऊट स्टॅडींग आहे. त्यामध्ये किती जण आहे? व्यापारी किती आहे?

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

सेसच्या बाबतीत मला त्याची........

**अनिल सावंतः-**

अंदाजे २५ असतील.

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)):-**

एल.बि.टी चे ७८ आऊट टुगेदर आहे. या लोकांचे रजिस्ट्रेशन झालेल आहे आणि ते कर भरतात.

**अनिल सावंतः-**

आता असं आहे की, याच्यामध्ये आऊट स्टॅडींग सर्वच नाही. २५ असतील ५० असतील. त्यांची एक्सपार्टी करुन तुम्ही प्रोव्हिजनल असेसमेंन्ट करुन पाठवून दयाना. गर्व्हरमेन्टचा कुठेही टॅक्स असा आहे की, जर मार्च चा टॅक्स मी भरला नाही तर एप्रिलचा टॅक्स गर्व्हरमेन्टला भरु शकत नाही. कारण तो अगोदर मार्चचा भरला पाहीजे. आणि याच्यामध्ये अस झालेलं आहे की, तुम्ही नंतरचा एप्रिलचा टॅक्स घेतलेला आहे. आणि त्याच्या अगोदरचा आऊट स्टॅडींग चा असाच राहिलेला आहे. तुम्ही कुठचही घ्या. इन्कम टॅक्स घ्या, सेल्स टॅक्स घ्या. कुठचीही असेसमेन्ट असं आहे. पूर्वी जर भरला नसेल तर तुम्ही ते भरु शकत नाही. मा. सभापती साहेब तुम्ही रुलिंग द्या. त्या पाटयावाल्यांना एक्स पार्टी प्रोव्हिजनल असेसमेंट करुन नोटीस काढा. जर भरल नसेल........

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.):-**

सन्मा. सदस्य इनामदार साहेब बोललो त्याप्रमाणे प्रत्येक डिफॉल्टरला.

**अनिल सावंतः-**

म्हणजे प्रत्येक डिफॉल्टर. आपल्याला इंटरेस्ट कसा आहे. म्हणजे पालिकेचे पैसे जमा व्हायला पाहिजे हा इंटरेस्ट फक्त त्यांच्या पाटयावाल्यांच्या किंवा इतर कोणाच्या मिटींग घेऊन निष्कर्ष निघत नाही. तर त्यांना नोटीसी पाठवा. त्याच्यावर पेनल्टी मारा, इन्ट्रेस्ट मारा. मग ते तुमच्याकडे धावत येतील. बँक अकाऊंट सिस करुन टाका. तुम्हाला तेवढे अधिकार आहे.

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.):-**

बँक अकाऊंट सिसच नाही

**अनिल सावंतः-**

सेसमध्ये आहे. सेस आणि व्हॅट साधारण सारखेच अधिकार आहेत. जर त्यांनी भरल नसेल तर त्यांच बँक अकाऊंट तुम्ही सिस करु शकता.

**प्रविण पाटीलः-**

आपण काही रि-असेसमेंट केले आहेत का? ज्यांनी कमी रेट भरलेला आहे.......

**अनिल सावंतः-**

मा. सभापती साहेब, रुलिंग द्या. नाहीतर वसुली होणार नाही. हे जबाबदार ऑफीसर हया ऑफीसर वरुन त्या ऑफीसर वर ढकलत राहणार आहे.

**मा. सभापतीः-**

काल या बाबतीमध्ये मी कमिश्नर साहेबांना भेटलो होतो. काल सुट्टी होती तरी देखिल मी आलेलो. आम्ही एक तास होतो. राऊत साहेब, काही पेपरमध्ये बातमी देखिल आली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांचा पगार पैसे अभावी समस्या चालू आहे. तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्याची प्रसिध्दी होते. लोकांना हे माहित नाही पडत की, अधिकारी आमच्याकडे काय करतात? मी काल त्याच्याबद्दल थोडासा आढावा घेतला. टॅक्स ८५ टक्के वसुल झालेली आहे. पाण्याच्या बाबतीमध्ये पण ८० टक्के एवढी चांगली वसुली झालेली आहे. ती थकबाकी कमी आहे. या ऑक्ट्रॉयच्या बाबतीमध्ये काल त्यांच्याकडून थोडक्यात माहिती मिळाली की, आम्ही किती जरी काही केलं तर सेस बाबतीमध्ये लोकल टॅक्स जो आहे तो आम्हाला ऑक्ट्रॉय एवढा मिळू शकणार नाही. आम्ही किती जरी प्रयत्न केले तरी त्याबाबतीमध्ये विचार करायला लागेल. शासनाने आपल्याला ३ महीन्याची मुदत दिली. एक ट्रायबेसेसवर आपल्याला कर आकारणी. तर माझं असं मत आहे की, हे जे आऊट स्टँडींग बाकी आहे त्याच्यावर आपण जोर दिलाच पाहिजे ना. आज एवढे दिवस झाले आपण मागतो. १८ गट आहे. १८ गटामध्ये कोणाचं काम समाधानकारक आहे? कोणाचं काय आहे? त्यांना अडचणी काय आहे? हयाबद्दल त्यांच्याकडे कोणीच मिटींग घेतली नाही. त्यांच्याकडून तुम्ही आढावा घ्या की, त्यांना अडचण काय होते? राऊत साहेब, मी तुम्हाला आजपासून सांगतो की, जेव्हापासून जनगणनेच काम चालू झालेले आहे. तेव्हापासून मिरा भाईंदर महानगरपालिकेत आम्ही कोणी आले की, ऑफीसमध्ये ओसाड असतं जस काय कोणी सुट्टी दिलेली आहे. कोणीही अधिकारी नाही. ठराविक जर सोडले तर कोणचं नाही. आणि जनगणनेच काम पण काय चाललं आहे त्याच्याबद्दल पण मी लेटर दिलेलं आहे. त्याची पण आम्ही पाहणी केली समाधानकारक काम ते पण चालू नाही. पानपट्टे साहेब त्याच्याबद्दलपण आढावा घ्या. मी लेटर दिलेले आहे. मला वाटते शांतीनगर येथे हायस्कुल आहे. त्यांचे शिक्षक अजून त्यावर काम नाही करत. कित्येक शाळेचे शिक्षक अजून काम नाही करत. तर त्याच्यावर मी कमिश्नर साहेबांना बोललो की, त्यांच्यावर कारवाई करा. ती काम वेळेवर झालीच पाहिजे ना. आपली सगळीच कामे बघून आपल्याला तेही काम करावे लागणार आहे. शेवटी उत्तर तुम्हालाच द्यायचं आहे. ते आऊट स्टँडींग च्या बाबतीमध्ये राऊत साहेब तुम्ही हयांची बैठक घ्या. स्पेशल बैठक घ्या तुम्ही आम्हाला सांगा. उद्या कींवा परवा घ्या आम्ही त्या ठिकाणी सदस्य उपस्थित राहतो म्हणजे कमीत कमी पेपरला तर येणार नाही. फार पाणी द्यायचा यांच्याकडे न्यायला पगार

द्यायला यांच्याकडे पैसे नाही महानगरपालिकेमध्ये आमची पत एवढया लवकर संपत असेल तर आम्ही बाकीची काही कामच काढायला नको.

**अनिल सावंतः-**

काम कुठे काढली?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त (मु.)ः-**

साहेब, आटाघाटाची तात्काळ बैठक घेऊन आढावा घेऊन आम्ही मा. आयुक्त साहेबां समोर.......

**मदन उदितनारायण सिंह :-**

बैठक घेवून त्यांना टाईम लिमिट दया आणि त्या टाईमामध्ये नाही झालं तर कारवाई करा.

**चंद्रकांत म्हात्रेः-**

त्या अठरा गटातल्या अधिकाऱ्यांना तुम्ही बोलवा आणि त्यांची मिटींग घ्या. त्यांना प्रेशराईज करा. साहेब तुम्ही दडपण आणल तरी काम होणार नाही.

**मा. सभापतीः-**

बेलवटे साहेब, आम्हाला जराशी माहिती द्या. आता आपण आम्हाला या ठिकाणी खर्चाचा आढावा दिलेला आहे. आता काय थकबाकी आपले पगार वगैरे कर्मचाऱ्यांचे थांबलेले आहेत का?

**शरद बेलवटेः-**

नाही.

**मा. सभापतीः-**

पेपरला आलं होत त्याचा आपण काय खुलासा केला का? तस पत्रकारांना काही माहिती दिली का? राऊत साहेब आपल्याकडे संगणक चालक आहे त्यांना आपण दोन महिने रजा दिलेली त्यांनी केलेल पण ते कामावर येवून काम करत होते. मग, त्यांना आपण काय २ महिन्याचा पगार दिलेला आहे की नाही. जे कामावर येत होते त्यांना

**शरद बेलवटेः-**

नाही दिला.

**मा. सभापतीः-**

मग, त्यांना पगार देणार की नाही? आपल्याकडे ते कामावर येत होते? आपण त्यांना नोटीस दिली पण जे कामावर येत होते २ महिने त्यांना तुम्ही राबवून घेतल तर त्यांना तुम्ही पगार देणार की नाही

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)ः-**

त्यांना जेव्हापासून अपॉईमेंट दिली तेव्हापासून त्यांना पगार लागू झाला.

**मा. सभापतीः-**

त्यांना पगार द्या. ते त्यांच्या वेळेपेक्षा जास्त काम करतात

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)ः-**

सगळेच काही काम करतात असं नाही.

**मा. सभापतीः-**

त्याच्यामध्ये होते ते आम्ही सांगतो. जे डयुटीवर होते त्यांना पगार द्या. आता माझ्या ऑफीस मध्ये आमची ऑपरेटर आहे. सगळयांकडे सुध्दा त्यांचे-त्यांचे ऑपरेटर काम करतात तर त्यांना आपण काय पगार देणार नाही का? त्यांचे पगार आपण का थांबवलेले आहे?

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)ः-**

थांबवलेले नाही १ एप्रिल पासून त्यांना अपॉईंटमेंट दिलेली होती. ज्या तारखेपासून अपॉईंटमेंट दिली त्या तारखेपासून......

**मा. सभापतीः-**

अपॉईंटमेंट दिली. परत त्यांना रुजु करून घेतल आणि त्याच्या अगोदरच काय? दोन महिने जे काम करत होते.

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)ः-**

त्याच काय तस प्रोव्हिजन नाही.

**मा. सभापतीः-**

तस कस चालेल. त्यांनी काम तर केलेल आहे ना मग अस कस चालेल.

**प्रविण पाटीलः-**

मग, तुम्ही लोकांनी त्यांच्याकडून काम करून घ्यायला नाही पाहीजे होत.

**मा. सभापतीः-**

त्यांनी काम केलेली आहेत ना. त्यांना तुम्ही पगारासाठी कसे नाही बोलणार? जे इतर कामगार आहेत ना त्यांच्यापेक्षा संगणक चालक जास्त काम करतात. त्यांच्याकडून आपण मोफत काम करुन घ्यायच. राऊत साहेब, अस चालणार नाही. तुम्ही त्याच्यावर निर्णय घ्या. त्यांचा पगार द्यावा लागेल. पानपट्टे साहेब, तुम्हाला त्या कर्मचाऱ्यांबद्दल सहानुभूती नाही का? का आम्हीच विचार करायला पाहीजे?

**संभाजी पानपट्टें (उपायुक्त (मु.):-**

जे-जे कर्मचारी काम करतात त्याचा आम्ही आढावा घेतो.

**मा. सभापती:-**

हो आढावा घ्या. ज्यांनी काम केललं आहे त्यांना पगार द्या.

**संभाजी पानपट्टें (उपायुक्त (मु.):-**

मध्यंतरी त्यांना कालखंड ब्रेक दाखवला होता. ते टेम्परी नोकरदार आहेत त्यांना ब्रेक देवून नंतर रि-अपॉईटमेंट देवून.

**अनिल सावंत:-**

तुम्ही आढावा कसला घेता?पानपट्टे साहेब, मला एक सांगा. तुमच्या क्लास-१ ऑफीसरला, क्लास-२ ऑफीसर आहेत त्यांना जर १० तारखेला पगार मिळतो आणि तीच जर ११ तारीख केली तर तुम्ही गप्प बसता का? त्यांनी प्रामाणिकपणे काम केलेले आहे. तर तुम्ही त्यांनासुध्दा प्रामाणिकपणे पगार द्या.

**प्रविण पाटील :-**

पानपट्टे साहेब, विभाग प्रमुखांनी लिहून दिले आहे की ते काम करतात आणि त्यांची आवश्यकता आहे. असे त्यांच्या विभागप्रमुखांचे पत्र आहे.

**अनिल सावंत :-**

परब साहेब, असे किती संगणक चालक आहेत ज्यांनी काम केलेले आहे आणि त्यांना पगार दिलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

नाही तर तुम्ही त्यांना स्प्ष्ट सांगा की तुम्ही काम करु नका आणि येवू पण नका.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, कालखंड त्यांना ब्रेक द्यावा लागणार.

**अनिल सावंत :-**

कुठच्या महिन्यापर्यंत त्यांना पगार दिलेला आहे.?

**गोविंद परब :-**

त्यांना फेब्रुवारीपर्यंत पगार दिलेला आहे. मार्च आणि एप्रिलचा दिलेला नाही.

**अनिल सावंत :-**

फेब्रुवारीपर्यंत नक्की दिलेला आहे. मार्चमध्ये तुम्ही त्यांना नोटीस दिली की, तुम्ही येवू नका म्हणून.

**गोविंद परब :-**

फेब्रुवारीमध्येच दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

फेब्रुवारीमध्ये ७९ जणांना दिलेली आहे?

**गोविंद परब :-**

हो.

**अनिल सावंत :-**

मग, त्याच्यानंतर सुध्दा काही लोक येत होती त्यांना तुम्ही काय केलं?

**मा. सभापती :-**

येते होते की नाही आपण त्यांना बोलवत होतो.  त्यांना प्रशासन देखील बोलवत होते.

**अनिल सावंत :-**

तुम्ही त्यांची प्रोव्हीजन काय केली? मार्च आणि एप्रिल दोन महिने त्यांना पगार नाही.

**याकुब कुरेशी :-**

याच्यामध्ये मला असे वाटते की, त्यांना निविदेप्रमाणे गॅप द्यावा लागतो तोच दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

दोन महिन्याचा नाही द्यावा लागत. एक दिवसाचा देतात.

**गोविंद परब :-**

साहेबांनी त्यांना ऑर्डरच उशीरा दिली ना. साहेबांनी ३० एप्रिल पासून दिली. त्यांनी ३० तारखेपासून पेमेन्ट द्या असे साहेबांनी सांगितले.

**अनिल सावंत :-**

मार्च आणि एप्रिलचे काय?

**गाविंद परब :-**

साहेबांकडून परत लेखी काढायला लागेल.

**अनिल सावंत :-**

संगणक चालक किती आहेत ते तरी काढा?

**गोविंद परब :-**

रेकॉर्ड मागवला आहे. किती, कोण कोण उपस्थित होते ते. मी साहेबांना अहवाल सादर करतो.

**अनिल सावंत :-**

राऊत साहेब जरा सिरीयसली घ्या की जे ५-६ वर्ष काम करतात आणि या शहरातली मुले आहेत आणि २ महिने पगार नसेल तर हे बर नाही ना. काही लोकांचे त्याच्यावर घर अवलंबून असेल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्यांची सही वगैरे असेल ना.

**गोविंद परब :-**

त्यावेळेला मस्टर ठेवलेले नव्हते. फक्त विभाग प्रमुखांनी लिहून द्यायचे. त्यांना कालावधी ठेवलेला नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

मी आयुक्त साहेबांशी चर्चा करतो.

**मा. सभापती :-**

आपण याबाबतीत कमिशनर साहेबांशी चर्चा करु आणि दुसरी गोष्ट अशी की, जे १८ विभागीय अधिकारी आहेत त्या वसुली वरती, आऊट स्टॅन्डीग त्याबद्दल एक स्पेशल मिटींग घ्या. आम्ही सगळे सदस्य येतो. थोडासा आढावा घ्यावा लागेल आणि सचिव साहेब पुढील विषय घेण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, हे टायमिंग कन्झुमिंग आहे. मा. आयुक्त साहेबांच्या त्यांच्या जवळ जवळ १५ मिटींग त्या डिफॉल्टर बरोबर झाल्या असतील अजून कसली मिटींग घेता. सरळ एक्स पार्टी असेसमेन्ट करा आणि त्यांना नोटीस पाठवून द्या ना.

**मा. सभापती :-**

त्यांना आपण एकदा भेटा. त्यांना अडचणी आहेत? ते सगळं आपण बघू या. नंतर काम नाही झाले तर आपण त्यांना नोटीस काढू.

**अनिल सावंत :-**

ठेकेदाराच्या अडचणी कशाला घेवून बसता ते काय म्हणतील की अडचणीत आहेत त्यांना पैसे द्यायचेच नाही. तो पालिकेचा रेव्हेन्यु आहे तो.

**मा. सभापती :-**

आपण त्यांना इथे एकदा या ठिकाणी बोलवू आणि चर्चा करु. त्यांच्याबद्दल आपण आढावा घेवू. त्याच्यानंतर आपण आज काय निर्णय घेतला कमिशनर साहेब पण आज नाही. आपण त्यांच्या बरोबर बसू ना. आपण स्पेशल मिटींग ठेवतो. कमिशनर साहेब काय सांगतात काय नाही ते आपण बघू.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मागच्यावेळी आपण जे.एन.एन.यु.आर.एम. चा आढावा घेतला होता. अर्ध्या पेक्षा जास्त दिवस आपण त्याच्यावर वेस्ट केला. त्याचे पुढे काय झाले? त्याला नोटीस वगैरे काढल्या का? त्या सुपर व्हाईजरला नोटीसी काढल्या का?

**मा. सभापती :-**

आपल्याला चर्चेसाठी परत विषय आणायला लागेल ना.

**अनिल सावंत :-**

या दोन महिन्यामध्ये प्रशासनाने काय केले, त्याच्यावर काय कारवाई केली का?

**मा. सभापती :-**

भुयारी गटार योजना, आपण चर्चा केलेली. पुन्हा माझ्या इकडे पण स्पेशल चर्चा झालेली. त्या दिवशी ते लोक मिटींगमध्ये आलेले. आता त्यांचे काम समाधानकरक आहे असे आम्हाला ऐकायला मिळतेय. ते अधिकारी सांगतात. या ठिकाणी आपण मिटींग घेतली, नाले सफाईच्या बाबतीमध्ये. त्यावेळेला मी, मा. महापौर, विरोधी पक्षनेते आम्ही सगळे होतो आणि अधिकारी भुयारी गटारी योजनेचा त्यावेळेला हा विषय मी स्वतः मांडला. नाशिकमध्ये भुयारी गटारीचा जो काही त्रास चालू आहे तुम्ही त्यावेळेला इथे चर्चा......

**अनिल सावंत :-**

साहेब, त्याला नोटीस काढली का?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, आपत्कालीन मिटींग लिया था उसमे बोला था की ३१ तारीख तक सब काम क्लिअर करेंगे। वह सृष्टी का पोलीस स्टेशनसे लेके ४०० गाडी रेती पडी है। पुरी खाडी मे जायेगी और पुरा मिरा भाईंदर डूबनेवाला है। पहली बारीश मे डूबनेवाला है।

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, भुयारी गटारी योजनेच्या बाबतीत आपण खुलासा द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मिटींग मे बोलते है की, काम होगा। लेकीन काम होता ही नही। सिर्फ मिटींगमे ही चर्चा होती है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नालेसफाई बिलकुल होत नाही.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, मी तुम्हाला विनंती करतो की, विषय होवू द्या. विषय झाल्यानंतर आयत्या वेळेस हा विषय घेवू या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आधी हे सगळे विषय घेवूया. त्यानंतर हा विषय घेवूया.

**याकुब कुरेशी :-**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर ०९ ते डिसेंबर ०९ पर्यंतचा त्रैमासीक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००९-१० या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर ०९ ते डिसेंबर ०९ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ९ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर ०९ ते डिसेंबर ०९ पर्यंतचा त्रैमासीक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २००९-१० या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर ०९ ते डिसेंबर ०९ पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यु विभागातील अहवाल पुस्तकांचे दर निश्चिती बाबत.

**अनिल सावंत :-**

पानपट्टे साहेब, हे जे रेट तुम्ही फायनल केले, २५ पाने पुस्तक ते ५० रु. आणि ५० पाने पुस्तकाची किंमत १०० रु. आपल्याला खर्च तेवढा होतो का?

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

तेवढाच खर्च होतो.

**अनिल सावंत :-**

पण त्याच्यामध्ये असं आहे, आता तुम्ही.....

**जुबेर इनामदार :-**

नर्सिंग रुम काढून......

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

नर्सिंग रुम, जनरल प्रॅक्टीस आणि हॉसपीटल.

**जुबेर इनामदार :-**

आधी १०० रु. होते. हे तर ५०० रु. घेतात. ते कुठे कोणाला स्वस्तात देतात.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

सेवा आहे. आपण कुठे त्यांच्याकडून वेगळे पैसे घेतो. त्यांचाच फॉर्म असतो.

**अनिल सावंत :-**

डॉक्टरांचा आहे ना. डॉक्टर लिहून देतात तो फॉर्म.

**जुबेर इनादार :-**

साधी नॉर्मल डिलीवरी केली तरी १०,०००/- रु., १५,०००/- रु. बिल करतात.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, छपाईचा खर्च होतो ना. अगोदर फुकटच करत होतो. आपण जरा बाईंडींग करुन चांगले दिले पाहिजे.

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, हा जो १० नंबरचा विषय आहे, जन्म-मृत्यु याच्यामध्ये जन्म-मृत्युच्या दाखल्यावरती १०० पैकी किती दाखले व्यवस्थित नावानिशी बरोबर असतात. प्रत्येक वेळेला स्पेलींग चूक काहीतरी चूक, त्यांना परत द्या परत जा. मला वाटते ८० टक्के दाखले हे चूकीचे दिले जातात. तर त्यांचे शिक्षण काय झालेले नाही.

**याकुब कुरेशी :-**

नावामध्ये फेरफार असतो, चूकीची नावे असतात हे काय जाणूनबुजून टाकतात.

**मा. सभापती :-**

हा जो जाणूनबुजून आहे. हे प्रकरण जाणूनबुजून आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, दोन मिटींग पूर्वी मी या विषयावर खुप बोललो.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, यापूर्वी होत होतं.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, त्या मिटींगमध्ये मी तुम्हांला सांगितलेलं सुध्दा की, आपली लोक किती चूका करतात? कुठे कुठे चूकी करतात? किती आम्ही सहन करायचे आणि किती पोटात घालायचं? पण लोकांनी कशाप्रकारे पैसे कमवायचे आणि कशाप्रमाणे नाही कमवायचे. त्याचा तरी विचार करा. अनाथ गरीब लोकांना असे हैराण करतात. उगाच विनाकारण या परिस्थितीमध्ये नावांमध्ये चूकी करतात.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

दोघांवर कारवाई केली.

**मा. सभापती :-**

साहेब, यापुढे जर माझ्याकडे केस आली नावासकट ते पण. तर १०० टक्के आम्ही सस्पेन्डची ऑर्डर काढू.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, त्यांना इंग्रजीमध्ये नाव लिहता येत नाही तर मराठीमध्ये लिहा ना.

**निर्मला सावळे :-**

त्यांचे शिक्षण किती?

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, कसं आहे की, आपला एक फॉर्म असतो.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, ज्या चूका झालेल्या आहेत त्याची दुरुस्ती पण होत नाही. मग त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे ना.

**बर्नड डिमेलो :-**

मी तुम्हांला एक उदाहरण देतो. सुरुवातीला त्याच मुलाचा जन्मदाखला घेवून गेला. त्यावेळी बरोबर होता. दुस-या वेळेला त्यांना त्या दाखल्याची गरज होती. त्यावेळेला नाव चुकलेले असते, असे का होते? जाणूनबुजून केले.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, म्हणूनच आता आपण काय केले की, स्वतः एक परफॉर्मर तयार केलेला आहे आणि तो परफॉर्मर हे नाव बरोबर आहे का असे त्यांना विचारतो आणि त्याच्या हस्तलिखित घेतो. त्याचे कोणीही नातेवाईक असेल त्यांच्याकडून फॉर्म भरुन घेतो, ते बरोबर आहे का बघतो. प्रिंट काढल्यानंतर त्यांना दाखवतो हे नाव बरोबर आहे का? जन्मतारीख बरोबर आहे का? नाव, आडनाव बरोबर आहे का? आता तशी सिस्टम सुरु केली. जुन्या काही चुका झाल्या असतील आता परत अशा चुका होणार नाही.

**याकुब कुरेशी :-**

मा. सभापती साहेब, आता जर मिस्टेक झाली तर काय कारवाई कराल ते जरा सभेला सांगा.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्यांच्याकडून समोरुन नाव लिहून घ्या.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब, लिहूनच घेतो. सुरु झाले.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मी जे विचारले त्याचे सांगा ना. आता जर या लोकांनी मिस्टेक केली तर त्याच्या जागेवर काय कारवाई कराल.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

साहेब असे आहे की, ॲप्लीकेशन घेतो त्यांनी भरल्यानंतर.......

**याकुब कुरेशी :-**

साहेब, आम्ही मान्य करतो ना.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

१०० टक्के कारवाई करु.

**निर्मला सावळे :-**

तुम्ही कारवाई काय करणार?

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त) :-**

केली होती ना. ४ महिन्यांपूर्वी स्टॅन्डीगमध्ये विषय निघाला होता.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब, या बाबतीमध्ये जन्म आणि मृत्युची दाखले देत असताना समोर त्या अर्जदाराकडून अर्ज लिहून घ्या, ॲड्रेस आणि नावाचा. तो तिकडे अर्ज ठेवा आणि त्याच्यानंतर जी सर्टीफिकेट वरती चूक झाली तर त्यांना तुम्ही इमिजीएट नोटीस द्यायची असे लेटर तुम्ही सध्या त्या विभागाला द्या. यापूढे आम्हाला एक ही नावामध्ये बदल आढळून आला तर आम्ही १०० टक्के निश्चितपणे कारवाई करु. विषय वाचून घ्या.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जन्म - मृत्यु विभागातील जन्म - मृत्युच्या नोंदणींकरिता खाजगी डॉक्टरांसाठी छापलेल्या पुस्तकांचे २५ पानी पुस्तकरिता रु. ५०/- व ५० पानी पुस्तकाकरिता रु. १००/- फी आकारणेबाबत मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. जन्म-मृत्युच्या दाखल्यामध्ये जर चूक आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशा मुद्यावर आपण हा विषय मंजूर करत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १० :-**

जन्म - मृत्यु नोंदणी पुस्तकांचे दर निश्चित करणे

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जन्म - मृत्यु विभागातील जन्म - मृत्युच्या नोंदणींकरिता खाजगी डॉक्टरांसाठी छापलेल्या पुस्तकांचे २५ पानी पुस्तकरिता रु. ५०/- व ५० पानी पुस्तकाकरिता रु. १००/- फी आकारणेबाबत मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक व सर्व्हेअर या पदावर नेमणूकीबाबत.

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिकेत सन १९९४-९५ पासुन तत्कालीन नगरपालिका कार्यकाळात शहरात पाण्याची भिषण टंचाई होती. त्यामुळे नागरीकांना पाणी वितरण सुरळीत होण्यास अडचणी येत असत. अश्यावेळी नागरीकांना टॅन्करद्वारे पाणी वितरीत करणे गरजेचे असल्याने तिन पाळयात पाण्याचे टॅन्कर चालवण्यासाठी वाहनचालकाची तात्पुरती भरती करण्यांत आली होती. त्या भरतीत एकुण चार वाहनचालक अनुक्रमे श्री. विलास साळवी, श्री प्रकाश पाटील, श्री. सदानंद धुरी व श्री. सुनिल लोनुष्टे यांना भरण्यांत येवुन टँकर तिन पाळयांत चालविण्यांत येत असत अश्याप्रकारे सेवायोजन कार्यालय, ठाणे, समाज कल्याण कार्यालय, ठाणे

यांचे कडील नावाची यादी व जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार मुदतीत प्राप्त अर्जदाराची मुलाखत घेवून निवड झालेल्या उक्त चार वाहनचालक यांना मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून त्याची प्रथम नियुक्ती करण्यांत आली. त्यानंतर वाहनचालकाची आवश्यकता पहाता वेळोवेळी मा.स्थायी समिती सभा व मा. महासभा यांच्या मान्यतेने कामाच्या आवश्यकतेनुसार मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यान महानगरपालिकेत कायम होण्यासाठी २४० दिवसानंतर सदर वाहनचालक यांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे कायम करण्यासाठी दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला म्हणुन त्यांनी त्यांचेवर अन्याय होत असल्याने मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल केले मा. उच्च न्यायालयाने त्यांची बाजु ऐकुन स्थगिती आदेश दिले व स्थगिती आदेशात महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई केल्याशिवाय कामावरुन कमी करु नये (Terminate the Services without following due process of law) त्यामुळे महानगरपालिकेने त्यांना कमी केलेले नाही. दरम्यान महानगरपालिकेत वाहनचालकाची आठ पदे मंजुर झाली त्या पदापैकी दोन रिक्त पदे सरळसेवेची होती. त्या दोन पदावर मुलाखतीद्वारे श्री. प्रकाश पाटील व श्री. सदानंद धुरी यांची दि. २२/११/२००७ पासुन गुणानुक्रमे निवड करण्यांत आली. त्यामुळे चार वाहन चालकांपैकी दोनच वाहनचालक हे अनुक्रमे श्री. विलास साळवी व श्री. सुनिल लोनुष्टे हे मा. उच्चन्यायालयाचे स्थगीती आदेशानुसार मानधनावर दि.२३/०५/१९९४ व दि.०४/११/१९९५ पासुन कार्यरत आहेत.

तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचे अहवालानुसार महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम विभागा अंतर्गत वाढलेल्या कामकाज पहाता रस्ते, गटारे, इतर बांधकामाचे आरेखन करणे, प्रत्यक्ष जागेवर जावुन लाईन आऊट देणे, लेव्हल घेणे, डी.पी. नुसार आखणी करणे आदी कामासाठी तांत्रीक कर्मचारी कमी असल्याने विभागाचे मागणी नुसार जाहिर वृत्तपत्रात जाहिराती देवून जाहिरातीद्वारे प्राप्त अर्जदारातुन मुलाखतीद्वारे गुणानुक्रमे आवश्यक शैक्षणीक पात्रता पहाता श्री. मनोजकुमार सिन्हा या सर्वेअरची निवड करुन मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२ ठराव क्र. ४५ अन्वये नेमणुकीस मंजुरी दिल्यानुसार दि. ०२/११/२००२ पासुन ठोक मानधनावर नियुक्ती करण्यांत आली होती. त्यावेळेपासुन विभागाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी मा.स्थायी समिती सभेत मुदतवाढ देण्यांत आली होती. दरम्यान त्यांनी महानगरपालिकेने कमी करु नये म्हणुन दि. २०/०४/२००५ रोजी मा. औद्योगिक न्यायालयात दावा क्र. १३८/२००५ दाखल केला. सदर दाव्यात मा. न्यायलयाचे स्थगीती आदेश असुन दावा प्रलंबीत आहे. परंतु मा. न्यायालयाचे स्थगीती आदेशानुसार ते मानधनावर कार्यरत आहेत.

अश्याप्रकारे श्री. विलास साळवी व श्री. सुनिल लोनुष्टे वाहनचालक व श्री. मनोजकुमार सिन्हा, सर्वेअर यांची पार्श्वपिठिका असुन त्यांनी दि. १५/०५/२०१० व दि. २१/०५/२०१० रोजी केलेल्या विनंती नुसार मा.न्यायालयात स्थगीती आदेश असुन दाव्याचा निकाल लागणेस विलंब होत असुन नोकरीत लागण्याची वयोमर्यादा पार झालेली असल्यामुळे कुठेही अन्यत्र नोकरी मिळणे अशक्य आहे. तसेच कौटुंबिक आर्थिक स्थिती खुपच हलाखीच आहे. त्यामुळे मिळत असलेल्या मानधनावर कुटूंबाचा उदर निर्वाह करणे फारच जिकरीचे व कष्टाचे होत असुन गेली सहा ते पंधरा वर्षे अनुक्रमे इमाने इतबारे मेहनतीने महानगरपलिकेत काम करीत होते. त्या सेवेत त्यांचेबाबत कोणतीही तक्रार नसून काम समाधानकारक होते. तसेच अन्य ठिकाणी शासन सेवेत भरतीची किमान वयोमर्यादा त्यांनी पार केलेली असल्यामुळे शासनात अन्य कुठे ही वयोमानानुसार नोकरी मिळणार नाही ही बाब लक्षात घेता श्री. विलास हरिभाऊ साळवी व श्री. सुनिल शांताराम लोनुष्टे (वाहन चालक) तर श्री. मनोज कुमार सिन्हा (सर्वेअर) यांना अनुक्रमे रिक्त वाहन चालक व सर्वेअर पदावर त्यांनी केलेल्या विनंती अर्जाचा सहानुभुतीपूर्वक सर्वानुमते विचार करुन महानगरपालिकेचे अभियोक्ते यांच्या प्राप्त अभिप्रायानुसार सभेस महानगरपालिके विरुध्द दाव्यात तडजोड करणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम - १९४९ चे कलम ४८१ (१) (ह) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार ही सभा मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे. त्यानुसार संबंधीतांकडून तडजोडीबाबत प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांना सदर ठरावाच्या दिनांकापासून रिक्त पदावर नियमित सेवेत समावून घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानुसार पुढील आवश्यक ती प्रशासकीय कारवाई मा. आयुक्त यांनी करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**निर्मला सावळे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**याकुब कुरेशी :-**

मला एक विचारायच आहे. कोर्टामध्ये स्थगिती होती. आणि याच्यामध्ये बाकीच्या ६ लोकांची नावे आहेत. आणि ४ लोकांची नेमणुक झाले. तर २ लोक का बाकी ठेवले? तर ते सुध्दा करून घ्यायला पाहिजे होते. त्याच्यासाठी स्थायी समितीसमोर कशाला आणल?

**गोविंद परब :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. एकूण ४ वाहन चालक होते. ९४ पासून त्याच्यापैकी २ वाहन चालकांना २००७ साली ८ पद मंजूर झाली होती. पण त्यात २ च सरळ सेवेची रिक्त असल्यामुळे म्हणून दोघांना पहिलच सामावून घेतलेल आहे. आणि २ च वाहन चालक शिल्लक होते. आता २ पद पुन्हा रिक्त झाली म्हणून त्यांना सामावून घेतलं. आणि सर्व्हेअर हे पद रिक्त नव्हत. हे पद आताच रिक्त झाल. त्यामुळे आता सर्व्हेअरला घेतल. आता फक्त ३ च होते आणि त्या तिघांना घेतलं.

**याकुब कुरेशी :-**

सर्व्हेअर पण आहेत ना. सर्व्हेअरची पद पण रिक्त झाली.

**गोविंद परब :-**

हो रिक्त झाले. सुनिल म्हात्रे हे काम करत होते. त्यांना मुख्य वरिष्ठ सर्व्हेअर म्हणून पदोन्नती दिली म्हणून जागेवर यांना सामावून घेतल.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये नियुक्ती बाबतीतच विषय आला म्हणुन म्हणतो. आपल्या महापालिकेतर्फे सहा नगररचना संचालक यांची परिक्षा वैगेरे झाली.

**गोविंद परब :-**

हो झाली आहे. निकाल लागायचा बाकी आहे. आचार संहिता होती म्हणून...

**अनिल सावंत :-**

त्यांच्यावर पी.आय.एल. वैगेरे दाखल हायकोर्टामध्ये झालेला आहे का?

**गोविंद परब :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला माहिती आहे. दाखल झालेल आहे. हायकोर्टाने दाखल करून घेतलेले आहे. त्याची माहीती तुमच्याजवळ आहे.

**गोविंद परब :-**

नाही,

**अनिल सावंत :-**

सहा संचालक नगररचना याची.......

**गोविंद परब :-**

याचा अहवाल नाही आला आहे.

**अनिल सावंत :-**

याची परिक्षा किंवा मुलाखत वैगेरे काही झाली का?

**गोविंद परब :-**

साहेब, परिक्षा होवून मुलाखती पण झाल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

मग, त्याच्यामध्ये किती पोस्ट आहेत?

**गोविंद परब :-**

एकच पोस्ट आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यावर भरतीबाबत मार्गदर्शक तत्वे या बाबतीत हायकोर्टामध्ये एक पी.आय.एल. दाखल झालेले आहे. आणि प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मग, तुम्ही भरतीची प्रक्रिया कशी काय चालू केली.

**मा. सभापती :-**

तो विषय येईल त्यावेळेला आपण बघू.

**अनिल सावंत :-**

विषय कधी येणार? ती भरती होऊन रुजू होतील.

**मा. सभापती :-**

आपल्याकडेच येईल,

**अनिल सावंत :-**

तुमच्याकडे कस येईल? भरती होऊन रुजू होईल. याच्यामध्ये जर माहिती नसेल तर माहिती करून घ्याना.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता आपण मगाशी ज्यांची भरती केली. त्याचा ठराव आपण आता केला.

**सुधीर राऊत :-**

जी भरती झाली ती पी.आय.एल. त्या निर्णयामुळे ही प्रक्रिया सुरू झाली. पी.आय.एल. मध्ये निर्णय असा झाला होता की, सहा संचालक हा त्या-त्या विभागाचा नसावा. एक नगररचना विभागाचा आणि तो महानगरपालिके अंतर्गत भरती करावी आणि त्याची नियुक्ती करावी. गर्व्हरमेन्टची जी पोस्ट होती ती अबॉलीज झाली. त्या ऐवजी महानगरपालिकेने करावी. त्यामुळे आपण ऑक्टोंबर पासून ही भरतीची प्रक्रिया सुरू केली. त्याच्यासाठी लेखी परिक्षा झाली. २१ फेब्रुवारी २०१० ला तद्नंतर इंटरव्हु या महिन्याच्या ८ तारखेला झाल्या.

आणि या दरम्यान आता आचारसंहिता लागली आहे. विधानपरिषद निवडणूकीची. ती उठलेली आहे. त्याच्यासाठी आपण रितसर भरतीची प्रक्रिया केली. एम.ए.बी.इ. किंवा बी.टेक. एम.ई. किंवा समकक्षक कॉलिफिकेशन आहे ज्याला नगररचना मधला किमान ६ वर्षाचा अनुभव आहे.

**प्रविण पाटील :-**

गेल्या १० ते १२ वर्षापासुन आपल्या आस्थापनेवर कामावर आहेत. तर त्यांची नोंदी कधीपासून होईल. आता होईल की, १०,१२ वर्षाचा.......

**मा. सभापती :-**

आतापासुन. आपण त्यांना आज मान्यता दिली. त्या अगोदर ते कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर होते. त्यांची आपल्याला माहिती द्या.

**प्रविण पाटील :-**

ते कॉन्ट्रक्ट बेसवर नव्हते.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) :-**

कोर्टामध्ये त्याच्यावर निर्णय करण्यासाठी आपण मंजूर देत आहोत. तडजोड झाल्यासाठी आपल्याला वकिलांचा अभिप्राय घ्यावा लागेल. आपल्या महानगरपालिकेचे वकिल जे आहेत. लेबर विषयक सल्लागार जागी सादगी त्यांच्यात या सर्व्हेअरच्या संदर्भात आणि उच्च न्यायालयाचे ॲड. रामचंद्र आपटे या दोघांचे कायदेशीर मत मागवल्यानंतर तडजोड करण्यात येईल. आणि नंतरच भरतीची प्रक्रिया करण्यात येईल.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक व सर्व्हेअर या पदावर नेमणूकीबाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

महानगरपालिकेत सन १९९४-९५ पासुन तत्कालीन नगरपालिका कार्यकाळात शहरात पाण्याची भिषण टंचाई होती. त्यामुळे नागरीकांना पाणी वितरण सुरळीत होण्यास अडचणी येत असत. अश्यावेळी नागरीकांना टॅन्करद्वारे पाणी वितरीत करणे गरजेचे असल्याने तिन पाळयात पाण्याचे टॅन्कर चालवण्यासाठी वाहनचालकाची तात्पुरती भरती करण्यांत आली होती. त्या भरतीत एकुण चार वाहनचालक अनुक्रमे श्री. विलास साळवी, श्री प्रकाश पाटील, श्री. सदानंद धुरी व श्री. सुनिल लोनुष्टे यांना भरण्यांत येवुन टँकर तिन पाळयांत चालविण्यांत येत असत अश्याप्रकारे सेवायोजन कार्यालय, ठाणे, समाज कल्याण कार्यालय, ठाणे यांचे कडील नावाची यादी व जाहिर वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार मुदतीत प्राप्त अर्जदाराची मुलाखत घेवून निवड झालेल्या उक्त चार वाहनचालक यांना मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून त्याची प्रथम नियुक्ती करण्यांत आली. त्यानंतर वाहनचालकाची आवश्यकता पहाता वेळोवेळी मा.स्थायी समिती सभा व मा. महासभा यांच्या मान्यतेने कामाच्या आवश्यकतेनुसार मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यान महानगरपालिकेत कायम होण्यासाठी २४० दिवसानंतर सदर वाहनचालक यांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे कायम करण्यासाठी दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला म्हणुन त्यांनी त्यांचेवर अन्याय होत असल्याने मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल केले मा. उच्च न्यायालयाने त्यांची बाजु ऐकुन स्थगिती आदेश दिले व स्थगिती आदेशात महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई केल्याशिवाय कामावरुन कमी करु नये (Terminate the Services without following due process of law) त्यामुळे महानगरपालिकेने त्यांना कमी केलेले नाही. दरम्यान महानगरपालिकेत वाहनचालकाची आठ पदे मंजुर झाली त्या पदापैकी दोन रिक्त पदे सरळसेवेची होती. त्या दोन पदावर मुलाखतीद्वारे श्री. प्रकाश पाटील व श्री. सदानंद धुरी यांची दि. २२/११/२००७ पासुन गुणानुक्रमे निवड करण्यांत आली. त्यामुळे चार वाहन चालकांपैकी दोनच वाहनचालक हे अनुक्रमे श्री. विलास साळवी व श्री. सुनिल लोनुष्टे हे मा. उच्चन्यायालयाचे स्थगीती आदेशानुसार मानधनावर दि.२३/०५/१९९४ व दि.०४/११/१९९५ पासुन कार्यरत आहेत.

तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचे अहवालानुसार महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम विभागा अंतर्गत वाढलेल्या कामकाज पहाता रस्ते, गटारे, इतर बांधकामाचे आरेखन करणे, प्रत्यक्ष जागेवर जावुन लाईन आऊट देणे, लेव्हल घेणे, डी.पी. नुसार आखणी करणे आदी कामासाठी तांत्रीक कर्मचारी कमी असल्याने विभागाचे मागणी नुसार जाहिर वृत्तपत्रात जाहिराती देवून जाहिरातीद्वारे प्राप्त अर्जदारातुन मुलाखतीद्वारे गुणानुक्रमे आवश्यक शैक्षणीक पात्रता पहाता श्री. मनोजकुमार सिन्हा या सर्वेअरची निवड करुन मा. स्थायी समिती सभा दि. २८/११/२००२ ठराव क्र. ४५ अन्वये नेमणुकीस मंजुरी दिल्यानुसार दि. ०२/११/२००२ पासुन ठोक मानधनावर नियुक्ती करण्यांत आली होती. त्यावेळेपासुन विभागाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी मा.स्थायी समिती सभेत मुदतवाढ देण्यांत आली होती. दरम्यान त्यांनी महानगरपालिकेने कमी करु नये म्हणुन दि. २०/०४/२००५ रोजी मा. औद्योगिक न्यायालयात दावा क्र. १३८/२००५ दाखल केला. सदर दाव्यात मा. न्यायलयाचे स्थगीती आदेश असुन दावा प्रलंबीत आहे. परंतु मा. न्यायालयाचे स्थगीती आदेशानुसार ते मानधनावर कार्यरत आहेत.

अश्याप्रकारे श्री. विलास साळवी व श्री. सुनिल लोनुष्टे वाहनचालक व श्री. मनोजकुमार सिन्हा, सर्वेअर यांची पार्श्वपिठिका असुन त्यांनी दि. १५/०५/२०१० व दि. २१/०५/२०१० रोजी केलेल्या विनंती नुसार मा.न्यायालयात स्थगीती आदेश असुन दाव्याचा निकाल लागणेस विलंब होत असुन नोकरीत लागण्याची वयोमर्यादा पार झालेली असल्यामुळे कुठेही अन्यत्र नोकरी मिळणे अशक्य आहे. तसेच कौटुंबिक आर्थिक स्थिती खुपच हलाखीच आहे. त्यामुळे मिळत असलेल्या मानधनावर कुटूंबाचा उदर निर्वाह करणे फारच जिकरीचे व कष्टाचे होत असुन गेली सहा ते पंधरा वर्षे अनुक्रमे इमाने इतबारे मेहनतीने महानगरपलिकेत काम करीत होते. त्या सेवेत त्यांचेबाबत कोणतीही तक्रार नसून काम समाधानकारक होते. तसेच अन्य ठिकाणी शासन सेवेत भरतीची किमान वयोमर्यादा त्यांनी पार केलेली असल्यामुळे शासनात अन्य कुठे ही वयोमानानुसार नोकरी मिळणार नाही ही बाब लक्षात घेता श्री. विलास हरिभाऊ साळवी व श्री. सुनिल शांताराम लोनुष्टे (वाहन चालक) तर श्री. मनोज कुमार सिन्हा (सर्वेअर) यांना अनुक्रमे रिक्त वाहन चालक व सर्वेअर पदावर त्यांनी केलेल्या विनंती अर्जाचा सहानुभुतीपूर्वक सर्वानुमते विचार करुन महानगरपालिकेचे अभियोक्ते यांच्या प्राप्त अभिप्रायानुसार सभेस महानगरपालिके विरुध्द दाव्यात तडजोड करणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम - १९४९ चे कलम ४८१ (१) (ह) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार ही सभा मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे. त्यानुसार संबंधीतांकडून तडजोडीबाबत प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांना सदर ठरावाच्या दिनांकापासून रिक्त पदावर नियमित सेवेत समावून घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानुसार पुढील आवश्यक ती प्रशासकीय कारवाई मा. आयुक्त यांनी करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

(के) अन्वये प्रस्ताव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जलवाहिनी योजनेअंतर्गत घेतलेल्या सहा कामगारांना सेवेत घेणे बाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेंत्रात पाणी पुरवठयाची भिषण समस्या ग्रासत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेस महाराष्ट्र शासनाने ५० द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर केला व या कामी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा मार्फत सदर योजना कार्यान्वीत करुन १३५० मि. मि. व्यासाची पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु केले असता काजुपाडा ते घोडबंदर दरम्यान क्षेत्रातील स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातुन पाईप लाईन जाउु देण्यास विरोध दर्शविला होता. पाण्याची भिषण समस्या व निकड लक्षात घेता तत्कालीन नगरपालिकेत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२(क) अन्वये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतुन पाण्याची पाईप लाईन जाउुन शेत जमिन बाधीत होत होती अश्या शेतकरी वा त्यांच्या वारस मुलांना रोजंदारी तत्वावर नगरपालिका सेवेत कामावर ठेवुन घेण्यात आले. परंतु नगरपालिकेले रोजंदारी तत्वावर भरती करु नये असे मा. संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचे दि.२१/०७/१९९२ रोजीच्या परिपत्रकात स्पष्ट नमुद असुन रोजंदारी कर्मचाऱ्यांची आवश्यक भासल्यास प्रकरणात मा. जिल्हाधिकारी सोा. यांच्या पुर्व परवानगीने ६० दिवसाकरीता नियुक्ती करावी व मुदतीनंतर कमी करावे. तथापी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १८२(क) अन्वये नगरपालिका सेवेत दि.२१/०२/२००० पासुन रोजंदारीवर प्रत्यक्ष सहा जण कार्यरत होते. परंतु त्यांना शासन परिपत्रकानुसार सेवा खंड न देता पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण होईपर्यंत नगरपालिका/महानगरपालिका सेवेत ठेवुन घेतले. तद्नंतर काम पुर्ण होवुन पाण्याची योजना कार्यान्वीत झाल्यानंतर दि. ३१/०१/२००४ रोजी कमी केले.

दि.०१/०२/२००४ (म.पु.) पासुन त्यांना कामावरुन कमी केल्यामुळे त्यांनी आदिवासी संघटनेमार्फत धरणे / आंदोलने सुरु केली. त्या आंदोलनाचे अनुषंगाने मा.महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये ज्या शेतकऱ्यांच्या शेतातुन पाण्याची पाईप लाईन गेल्यामुळे शेती बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना महानगरपालिका सेवेत घेण्याबाबत पारीत करण्यात आलेला ठराव मा. आयुक्त सोा. यांनी मनपा/आस्था/१८०५/११५५२/०३-०४ दि.११/०२/२००४ अन्वये मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे अभिप्रायार्थ पाठविला होता.

सदर प्रस्तावास अनुसरुन कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांचे क्र. मिभापा/२००४/४६९/प्र.क्र.१४०/०४/नवि-२८ दि. २६/०६/२००६ रोजीच्या प्राप्त अभिप्रायात मिरा भाईंदर नगरपालिका ही महानगरपालिका झाली असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदीनुसार वर्ग-३ व वर्ग-४ चे पदावर नियुक्ती करणेस महानगरपालिका सक्षम आहे. त्या

पत्रास अनुसरुन महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/आयूक्त/१०५/०६-०७ दि. ३०/०९/२००६ अन्वये मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांना मा. महासभेच्या मंजुरीने रिक्त असलेल्या सफाई कामगार या पदावर उपरोक्त पाण्याच्या पाईप लाईनमुळे बाधित शेतकऱ्यांच्या वारसांना नेमणुक करणे योग्य होईल अशी धारणा असुन सदर धारणा पक्की करणेस विनंती केलेली होती परंतु त्याबाबत शासनाकडुन कोणत्याही प्रकारे अभिप्राय प्राप्त नाहीत. दरम्यान शासनास पाठविलेल्या पत्राचे अनुषंगाने मा. महासभा दि.२०/१०/२००६ ठराव क्र. ६२ व मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ७० अन्वये पाण्याच्या पाईप लाईंनमुळे बाधित शेतकरी वा त्यांच्या वारसांना महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार या रिक्त पदांवर खास व अपवादात्मक बाब म्हणुन नेमणुक देणेस मान्यता दिली आहे. परंतु अद्याप महानगरपालिकेने मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२ (क) अन्वये रोजंदारीवर नेमणुक केलेल्या सहा शेतकऱ्यांच्या वारसांना कायम नोकरीत ठेवुन न घेता कामावरुन कमी केले दरम्यान कामावरुन कमी केलेल्या रोजंदारी कामागारांच्या वारस पत्नी यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे विनंती अर्ज केलेला होता त्या अर्जानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडील दि. ०१/०६/२०१० रोजीच्या पत्रात असे नमुद केले आहे की, प्रकरणांतील संबंधित रोजंदारीवरुन कमी केलेल्या कामगारांच्या वारस पत्नी या महिलांना आर्थिक व मानसिक त्रास होत असल्याचे दिसुन येते हयात श्रीम. स्वाती महादेव तारवी हयांच्या पतीने (कै. महादेव मंगल तारवी) बेरोजगारीला कंटाळुन आत्महत्या केली आहे. व इतरांची तशी मनस्थिती आहे. असे लेखी कळविले आहे. तसेच त्यांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे सुध्दा दावा दाखल करुन प्रकरण न्याय प्रविष्ठ केले आहे.

वरील प्रस्तावित नमुद वस्तुस्थिती हि सत्य असुन तत्कालीन नगरपालिकेत पाण्याची भिषण टंचाई पाहता नागरीकांना पाणी पुरवठा होण्यासाठी पाण्याची पाईपलाईन टाकणे आवश्यक होते. परंतु शेतकऱ्यांनी पाण्याची पाईपलाईन टाकणेस केलेल्या विरोधामुळे नगरपालिकेने शेतकऱ्यांस वा त्याच्या वारसांना नगरपालिकेत कामाला ठेवुन घेण्याबाबत आश्वासन दिले होते जर त्यावेळी त्यांना आश्वासन देवुन कामावर ठेवुन घेतले नसले तर शेतकऱ्यांनी त्यांचे जागेतुन पाण्याची पाईपलाईन टाकण्यास दिली नसती व पाण्याची पाईपलाईन मुदतीत टाकण्यात आली नसती तर भाईंदरची भिषण पाणी समस्या सुटण्यास अडचण झाली असती. ही बाब तत्कालीन मा. स्थायी समिती सभेच्या निदर्शनास आणल्यामुळेच पाण्याची पाईप टाकण्यासाठी विरोध दर्शविलेल्या शेतकऱ्यांचे वारस मुलांना नोकरीस ठेवुन घेतले होते. परंतु त्यांना पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण होवुन योजना कार्यान्वीत झाल्यावर कामावरुन कमी केले कामावरुन कमी केल्यामुळे त्यांनी दि. ०१/०२/२००४ पासुन अनेक वेळा महानगरपालिकेजवळ, शासनाजवळ अर्ज विनंत्या केल्या, आंदोलन केले अश्या प्रकारे वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील नोकरी न मिळाल्याने आंदोलनाचा कोणताही परिणाम शासन प्रशासनावर न झाल्याने नाराज झालेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे मनोधैर्य खचले गेले व त्यातील एकाने बेकारीला कंटाळुन दि.११/०६/२००८ रोजी आत्महत्या केली परंतु त्यांनतरही महानगरपालिकेने नोकरी देण्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना न केल्यामुळे सद्यस्थितीत त्यांची व त्यांचे कुटूंबाची आर्थिक व मानसिक स्थिती बेकारीमुळे फारच त्रासदायक झाली असुन मयत कै.महादेव मंगल तारवी याची पत्नी श्रीम. स्वाती महादेव तारवी यांनी अर्जात नमुद केल्यानुसार बेरोजगारीला कंटाळुन त्यांच्या पतीने आत्महत्या केली त्याचप्रमाणे इतरांची मनस्थिती होत आहे असे कळविले आहे.

तरी काजुपाडा ते चेणे दरम्यान पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी शेतजमिनीमधुन परवानगी दिली ते सर्व शेतकरी हे आदीवासी जमातीचे असुन अत्यंत गरीब कुटूंबातील आहेत तसेच त्यांनी यापुर्वी महानगरपालिकेत चांगल्याप्रकारे काम केलेले असुन त्यांनी नोकरी मिळणेसाठी अनेक अर्ज, विनंत्या, मोर्चे महानगरपालिकेवर आणले परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी मा. औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केला असुन तो प्रलंबित आहे. अश्याप्रकारे मिरा भाईंदर महानगरपालिकेस ५० द.ल.ली. वाढीव पाणीपुरवठा पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठी ज्या शेतकऱ्यांनी स्वतःचे जमिनीतुन जागा दिली त्या शेतकऱ्यांचे वारसांना त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार नोकरी देणे महानगरपालिकेचे कर्तव्य ठरते. परंतु त्यांना नोकरी न दिल्यामुळे एकाने बेकारीला कंटाळुन आत्महत्या केली तर इतरांची सुध्दा मनस्थिती तशीच झालेली आहे. परंतु यापुढे असा प्रसंग उद्‌भवू नये म्हणुन त्या शेतकऱ्यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने सहानुभुती म्हणुन अनुक्रमे १) श्री. प्रदिप बिस्तुर मरले, २) श्रीम. स्वाती महादेव तारवी, ३) श्री. पुंडलिक वासुदेव चौधरी, ४) श्री. महादेव कृष्णा तारवी, ५) श्री. उमेश शनिवार तारवी, ६) श्री. शशिकांत बाबु तारवी यांना मा. औद्योगिक न्यायालयातील दावा त्यांनी मागे घेण्याचे अटीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (१) (ह) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार हि सभा मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रकरणात तडजोडीची कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करीत आहे. त्यानुसार संबंधितांकडुन तडजोडीबाबत प्रतिज्ञापत्र घेवुन सफाई कामगार अथवा मजुर या रिक्त नियमीत पदावर सेवेत सामावुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार पुढील आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही मा.आयुक्त सो. यांनी पुर्ण करणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**निर्मला सावळे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. :-**

प्रकरण २(के) अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जलवाहिनी योजनेअंतर्गत घेतलेल्या सहा कामगारांना सेवेत घेणे बाबत.

**ठराव क्र. ९अ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेंत्रात पाणी पुरवठयाची भिषण समस्या ग्रासत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेस महाराष्ट्र शासनाने ५० द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर केला व या कामी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा मार्फत सदर योजना कार्यान्वीत करुन १३५० मि. मि. व्यासाची पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु केले असता काजुपाडा ते घोडबंदर दरम्यान क्षेत्रातील स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातुन पाईप लाईन जाउु देण्यास विरोध दर्शविला होता. पाण्याची भिषण समस्या व निकड लक्षात घेता तत्कालीन नगरपालिकेत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२(क) अन्वये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतुन पाण्याची पाईप लाईन जाउुन शेत जमिन बाधीत होत होती अश्या शेतकरी वा त्यांच्या वारस मुलांना रोजंदारी तत्वावर नगरपालिका सेवेत कामावर ठेवुन घेण्यात आले. परंतु नगरपालिकेले रोजंदारी तत्वावर भरती करु नये असे मा. संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचे दि.२१/०७/१९९२ रोजीच्या परिपत्रकात स्पष्ट नमुद असुन रोजंदारी कर्मचाऱ्यांची आवश्यक भासल्यास प्रकरणात मा. जिल्हाधिकारी सो. यांच्या पुर्व परवानगीने ६० दिवसाकरीता नियुक्ती करावी व मुदतीनंतर कमी करावे. तथापी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १८२(क) अन्वये नगरपालिका सेवेत दि.२१/०२/२००० पासुन रोजंदारीवर प्रत्यक्ष सहा जण कार्यरत होते. परंतु त्यांना शासन परिपत्रकानुसार सेवा खंड न देता पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण होईपर्यंत नगरपालिका/महानगरपालिका सेवेत ठेवुन घेतले. तद्नंतर काम पुर्ण होवुन पाण्याची योजना कार्यान्वीत झाल्यानंतर दि. ३१/०१/२००४ रोजी कमी केले.

दि.०१/०२/२००४ (म.पु.) पासुन त्यांना कामावरुन कमी केल्यामुळे त्यांनी आदिवासी संघटनेमार्फत धरणे / आंदोलने सुरु केली. त्या आंदोलनाचे अनुषंगाने मा.महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये ज्या शेतकऱ्यांच्या शेतातुन पाण्याची पाईप लाईन गेल्यामुळे शेती बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना महानगरपालिका सेवेत घेण्याबाबत पारीत करण्यात आलेला ठराव मा. आयुक्त सो. यांनी मनपा/आस्था/१८०५/११५५२/०३-०४ दि.११/०२/२००४ अन्वये मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे अभिप्रायार्थ पाठविला होता.

सदर प्रस्तावास अनुसरुन कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांचे क्र. मिभापा/२००४/४६९/प्र.क्र.१४०/०४/नवि-२८ दि. २६/०६/२००६ रोजीच्या प्राप्त अभिप्रायात मिरा भाईंदर नगरपालिका ही महानगरपालिका झाली असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदीनुसार वर्ग-३ व वर्ग-४ चे पदावर नियुक्ती करणेस महानगरपालिका सक्षम आहे. त्या पत्रास अनुसरुन महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/आयूक्त/१०५/०६-०७ दि. ३०/०९/२००६ अन्वये मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांना मा. महासभेच्या मंजुरीने रिक्त असलेल्या सफाई कामगार या पदावर उपरोक्त पाण्याच्या पाईप लाईनमुळे बाधित शेतकऱ्यांच्या वारसांना नेमणुक करणे योग्य होईल अशी धारणा असुन सदर धारणा पक्की करणेस विनंती केलेली होती परंतु त्याबाबत शासनाकडुन कोणत्याही प्रकारे अभिप्राय प्राप्त नाहीत. दरम्यान शासनास पाठविलेल्या पत्राचे अनुषंगाने मा. महासभा दि.२०/१०/२००६ ठराव क्र. ६२ व मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ७० अन्वये पाण्याच्या पाईप लाईनमुळे बाधित शेतकरी वा त्यांच्या वारसांना महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार या रिक्त पदांवर खास व अपवादात्मक बाब म्हणुन नेमणुक देणेस मान्यता दिली आहे. परंतु अद्याप महानगरपालिकेने मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२ (क) अन्वये रोजंदारीवर नेमणुक केलेल्या सहा शेतकऱ्यांच्या वारसांना कायम नोकरीत ठेवुन न घेता कामावरुन कमी केले दरम्यान कामावरुन कमी केलेल्या रोजंदारी कामागारांच्या वारस पत्नी यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे विनंती अर्ज केलेला होता त्या अर्जानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडील दि. ०१/०६/२०१० रोजीच्या पत्रात असे नमुद केले आहे की, प्रकरणांतील संबंधित रोजंदारीवरुन कमी केलेल्या कामगारांच्या वारस पत्नी या महिलांना आर्थिक व मानसिक त्रास होत असल्याचे दिसुन येते हयात श्रीम. स्वाती महादेव तारवी हयांच्या पतीने (कै. महादेव मंगल तारवी) बेरोजगारीला कंटाळुन आत्महत्या केली आहे. व इतरांची तशी मनस्थिती आहे. असे लेखी कळविले आहे. तसेच त्यांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे सुध्दा दावा दाखल करुन प्रकरण न्याय प्रविष्ठ केले आहे.

वरील प्रस्तावित नमुद वस्तुस्थिती हि सत्य असुन तत्कालीन नगरपालिकेत पाण्याची भिषण टंचाई पाहता नागरीकांना पाणी पुरवठा होण्यासाठी पाण्याची पाईपलाईन टाकणे आवश्यक होते. परंतु शेतकऱ्यांनी पाण्याची पाईपलाईन टाकणेस केलेल्या विरोधामुळे नगरपालिकेने शेतकऱ्यांस वा त्याच्या वारसांना नगरपालिकेत कामाला ठेवुन घेण्याबाबत आश्वासन दिले होते जर त्यावेळी त्यांना आश्वासन देवुन कामावर ठेवुन घेतले नसले तर शेतकऱ्यांनी त्यांचे जागेतुन पाण्याची पाईपलाईन टाकण्यास दिली नसती व पाण्याची पाईपलाईन मुदतीत टाकण्यात आली नसती तर भाईंदरची भिषण पाणी समस्या सुटण्यास अडचण झाली

असती. ही बाब तत्कालीन मा. स्थायी समिती सभेच्या निदर्शनास आणल्यामुळेच पाण्याची पाईप टाकण्यासाठी विरोध दर्शविलेल्या शेतकऱ्यांचे वारस मुलांना नोकरीस ठेवुन घेतले होते. परंतु त्यांना पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण होवुन योजना कार्यान्वीत झाल्यावर कामावरुन कमी केले कामावरुन कमी केल्यामुळे त्यांनी दि. ०१/०२/२००४ पासुन अनेक वेळा महानगरपालिकेजवळ, शासनाजवळ अर्ज विनंत्या केल्या, आंदोलन केले अश्या प्रकारे वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील नोकरी न मिळाल्याने आंदोलनाचा कोणताही परिणाम शासन प्रशासनावर न झाल्याने नाराज झालेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे मनोधैर्य खचले गेले व त्यातील एकाने बेकारीला कंटाळुन दि.११/०६/२००८ रोजी आत्महत्या केली परंतु त्यांनतरही महानगरपालिकेने नोकरी देण्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना न केल्यामुळे सद्यस्थितीत त्यांची व त्यांचे कुटूंबाची आर्थिक व मानसिक स्थिती बेकारीमुळे फारच त्रासदायक झाली असुन मयत कै.महादेव मंगल तारवी याची पत्नी श्रीम. स्वाती महादेव तारवी यांनी अर्जात नमुद केल्यानुसार बेरोजगारीला कंटाळुन त्यांच्या पतीने आत्महत्या केली त्याचप्रमाणे इतरांची मनस्थिती होत आहे असे कळविले आहे.

तरी काजुपाडा ते चेणे दरम्यान पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी शेतजमिनीमधुन परवानगी दिली ते सर्व शेतकरी हे आदीवासी जमातीचे असुन अत्यंत गरीब कुटूंबातील आहेत तसेच त्यांनी यापुर्वी महानगरपालिकेत चांगल्याप्रकारे काम केलेले असुन त्यांनी नोकरी मिळणेसाठी अनेक अर्ज, विनंत्या, मोर्चे महानगरपालिकेवर आणले परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी मा. औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केला असुन तो प्रलंबित आहे. अश्याप्रकारे मिरा भाईंदर महानगरपालिकेस ५० द.ल.ली. वाढीव पाणीपुरवठा पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठी ज्या शेतकऱ्यांनी स्वतःचे जमिनीतुन जागा दिली त्या शेतकऱ्यांचे वारसांना त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार नोकरी देणे महानगरपालिकेचे कर्तव्य ठरते. परंतु त्यांना नोकरी न दिल्यामुळे एकाने बेकारीला कंटाळुन आत्महत्या केली तर इतरांची सुध्दा मनस्थिती तशीच झालेली आहे. परंतु यापुढे असा प्रसंग उद्‌भवू नये म्हणुन त्या शेतकऱ्यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने सहानुभुती म्हणुन अनुक्रमे १) श्री. प्रदिप बिस्तुर मरले, २) श्रीम. स्वाती महादेव तारवी, ३) श्री. पुंडलिक वासुदेव चौधरी, ४) श्री. महादेव कृष्णा तारवी, ५) श्री. उमेश शनिवार तारवी, ६) श्री. शशिकांत बाबु तारवी यांना मा. औद्योगिक न्यायालयातील दावा त्यांनी मागे घेण्याचे अटीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (१) (ह) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार हि सभा मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रकरणात तडजोडीची कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करीत आहे. त्यानुसार संबंधितांकडुन तडजोडीबाबत प्रतिज्ञापत्र घेवुन सफाई कामगार अथवा मजुर या रिक्त नियमीत पदावर सेवेत सामावुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार पुढील आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही मा.आयुक्त सो. यांनी पुर्ण करणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, भाईंदर (प.) उड्डाणपूल रस्त्यावरील पाली बिच रिसॉर्ट यांनी स्वखर्चाने विकसित करुन देखभाल व दुरुस्ती करीत असलेला वाहतुक बेट ३ वर्ष कालावधी करिता नुतनीकरण करणेस मान्यता देणे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. हा विषय आता ठिक आहे. याच बरोबर बरेच असे बेटे आहेत. आपल्या छत्रपती शिवाजी महामार्गावर २ मुख्य म्हणजे दिपक हॉस्पिटलच्या समोर आणि गोल्डन नेस्टसमोर ४ पुतळे बिना कपड्याचे उभे केले आहे. एक तर त्यातला त्यादिवशी पडला त्या सुरूवातीला सुशोभिकरण केल होत. त्या बिल्डरने आणि व्यस्थित काम केल होत. आता त्याला तो बघायला सुध्दा जात नाही. तसेच दिपक हॉस्पीटलच्या समोर ती एक बाई पाणी ओतायची. ते पाणीच बंद पडल.

**दिपक खांबीत :-**

साहेब, गोल्डन नेस्टच्या इकडच रिपेरिंग करून घेतल होत.

**जुबेर इनामदार :-**

कुठे, ते रिपेअरिंग करून होत का? त्याला काय अर्थ आहे? त्याला माडी पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

ते रिपेअरिंग कोण करत? किंवा आपणच करायच की त्या लोकांनी करायच?

**दिपक खांबित :-**

ते लोक रिपेअरिंग करतात.

**जुबेर इनामदार :-**

ते मन्टेन करत नाही. त्यांना तशी नोटिस पाठवा आणि त्यांच्याकडून काढून घ्या.

**याकुब कुरेशी :-**

खांबित साहेब, तुमच्या माहितीप्रमाणे सांगतो की मीसुध्दा अशीच परवानगी मागितलेली भाईंदर पोलिस स्टेशनच्या समोर सुशोभिकरण करण्याकरिता मी त्यावेळी पत्र दिल. तर त्याच्यानंतर मला काही उत्तर दिलच नाही. आणि याच्यावर काही कारवाई झालीच नाही. तर कधी होणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, पोलिस स्टेशनच्या इकडे क्रॉस आहे ना तो जाईल.

**याकुब कुरेशी :-**

तो नाही झाला तर.

**दिपक खांबित :-**

साहेब, तस प्लान करतो.....

**याकुब कुरेशी :-**

चालेल.

**दिपक खांबित :-**

आणि राम मंदिरच्या तिकडे शिफ्ट करता येत का ते बघू या.

**याकुब कुरेशी :-**

चौक तर मोठा जालाच पाहिजे. ट्राफिक केवढी होते. अडचण होते.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेबांच खाजगीकरण करण्याच धोरण चांगल आहे. त्याच्यावर नियंत्रण राहत नाही ते लोक करत नाही त्याच काय?

**दिपक खांबित :-**

साहेब, केल. मी स्वतः फिरलो. कुठे आढळल नाही.

**जुबेर इनामदार :-**

करतच नाही. आढळल काय? आपण आता जावून परत बघू शकता. गोल्डन नेस्टची परिस्थिती बघा. दिपक हॉस्पीटलची परिस्थिती बघा.

**याकुब कुरेशी :-**

पाली बिचच पण आहे. तिकडे पण सुशोभिकरण करायच आहे. नुसत बोर्ड लागलेले आहे. पण तिकडे गवतावर पाणी टाकण किंवा सुशोभिकरण करण, गवत कापणे, ॲक्च्युअली ते खर्चीक आहे. ते होत नाही. त्याच्यावर थोडासा माणसाचा किंवा गार्डनची देखभाल करण्यासाठी त्यांची नेमणूक करा. आणि त्यांच्याजवळ......

**दिपक खांबित :-**

आम्ही आढावा घेत असतो.

**अनिल सावंत :-**

मग, आढावा घेतल्यानंतर आणायच ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पाली बिचचे जे रिसॉर्टचे बोर्ड लावलेले आहे पण, त्या जागी दुसरे पण बोर्ड लागलेले आहे. तर दुसरे बोर्ड लावायला कशी काय आणि कोण परवानगी देतात?

**दिपक खांबीत :-**

साहेब नसतात.

**याकुब कुरेशी :-**

२-२ बोर्ड असतात.

**अनिल सांवत :-**

मा. सभापती साहेब, मला एक सांगा आपण त्यांना काय दिल? वाहतुक बेट दिल आहे. आणि बाजुला होर्डिंग्ज आहे ते .

**चंद्रकांत म्हात्रे :-**

होर्डिंग्ज कोणाचे आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच आपल्या महापालिकेला रिन्युव्ह मिळत का?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

काही नाही मिळत.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
जाहिरात फी मिळते.
**अनिल सावंत :-**
नाही मिळत. तुम्ही जाहिरात वाल्यांना विचारा.
**दिपक खांबित :-**
त्यांना बोर्ड ४९ चा असेल. त्याच्यामध्ये पैसे घेत नही.
**अनिल सावंत :-**
कसे?
**दिपक खांबित :-**
ते छोटे बोर्ड असतात. पाली बिचच त्याचे भाडे भरत नाही. ते मधल्यामध्ये आहे. बाकी जे काही आहे. त्यांचे पैसे मिळतात.
**अनिल सावंत :-**
ते बोलतात ना. माहिती पाहिजे ना. पानपट्टे साहेबांना माहितच नाही की जाहिरातवाले कोण आहे? साहेब, तुमच्याजवळ जाहिरातचा विषय आहे. त्याच्यामध्ये डाऊट आहे ते बघा. व्ही आर नॉट गेटींग रिन्युव्ह. तिथे दोन मोठे होर्डिंग्ज लागलेले आहेत. तुम्ही सुशोभिकरणाला वाहतुक बेट द्या. त्याला मंजुरी द्या. पण ते जे होर्डिंग्ज लागलेले आहे. त्याचा रिन्युव्ह पालिकेला मिळायला पाहिजे.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
त्यांचे मिनिमम रेट आहेत. महानगरपालिकेचे आहेत त्या प्रमाणे वसुल करतो.
**चंद्रकांत म्हात्रे :-**
साहेब, तिथे भरपूर बोर्ड लागतात.
**अनिल सावंत :-**
आता आपले ४१०० रू. आहेत. आपल्याला तेवढे मिळायला पाहिजे ना.
**जुबेर इनामदार :-**
साहेब, आपण बर्याच शहरामध्ये जातो. तिथे किती शोभिवंत असतात. काहीतरी काऊंन्टन असायला पाहिजे. चांगली झाडे, फुले लागलेली पाहिजे. आपण त्यांना दिल्यानंतर ते विसरून जातात. मग, त्याचा काय अर्थ?
**प्रविण पाटील :-**
मा. सभापती साहेब, आपले काही चांगले शिल्पकार आहेत. त्यांच्याकडून चांगली शिल्प तयार करून घ्या. आणि तिथे चांगली लावा.
**चंद्रकांत म्हात्रे :-**
साहेब, काशिमिरा मुख्य प्रवेशद्वारा जवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुरवठा तयार केलेला आहे. तर त्या जागी इतके इतके होर्डिंग्ज लागतात की, विचारून सोय नाही. त्याच्यावर काही बंदी घाला.
**याकुब कुरेशी :-**
माझ्या माहितीनुसार एका मिटिंगमध्ये हा विषय झालेला मंजूर झालेला. मंजूर झाले की, तिकडे कोणालाही बोर्ड लावायची परवानगी द्यायची नाही. मग, बोर्ड कसे लागतात? कारवाई का करत नाही.
**चंद्रकांत म्हात्रे :-**
मुख्य प्रवेशद्वार तर ते दिसतच नाही.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
साहेब, वेळोवेळी  कारवाई करतो. पण, सगळ्याच पक्षाचे बोर्ड लागतात.
**याकुब कुरेशी :-**
तुम्ही कारवाई कराना.
**चंद्रकांत म्हात्रे :-**
साहेब ते मुख्य प्रवेशद्वार दिसतच नाही..
**याकुब कुरेशी :-**
तुम्ही तिथे नोटीस बोर्ड लावा ना.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
साहेब, तिथे नोटीस बोर्ड आहे.
**याकुब कुरेशी :-**
नाही.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
नोटीस बोर्ड आहे. फिक्स बोर्ड तो लावलेला आहे.
**चंद्रकात म्हात्रे :-**
छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा झाकला जातो.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. आयुक्त साहेब, उधर आज ही साफ कर दो। जो भी पार्टीका जितना भी बोर्ड है वह आज ही साफ करदो।

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

आजच्या आज बोर्ड काढून घेतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची साफसफाई पण होत नाही.

**अनिल सावंत :-**

फक्त वाहतुक बेटाच द्या. होर्डिंग्जच देवू नका. वाहतुक बेटावर बोर्ड लावतो. आणि मिरा भाईंदर महानगरपालिका सुशोभिकरण किंवा मेन्टेनन्स बाय पाली बिच अस करा. म्हणजे त्यांना दिले म्हणून त्यांच्याच नावावर करू नका ती महापालिकेची प्रॉपर्टी आहे.

**प्रविण पाटील :-**

मेडतियाला दिले. किती वर्षापासून तोच आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

भाईंदर (प.) पाली बिच रिसोर्ट, पाली चौक रोड, उत्तन यांना महानगरपालिका हद्दीत उड्डाणपूल उतरल्यावर टॉवरपर्यंत भाईंदर (प.) येथे वाहतूक बेट विकसित करुन देखभाल व दुरुस्ती करणे. व त्यांनी मोबदल्यात सदर ठिकाणी संस्थेची जाहिरात करणे बाबत इकडील मनपा/साबां/१०५३/०४-०५ दि.४/६/०४ परवानगी दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समिती दि.५/६/२००७ ठराव क्र.४२ नुसार पुढील तीन वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात आले आहे. करारनाम्यातील अटीशर्तीचे पाली बिच रिसोर्ट यांनी पालन केले असून सदर वाहतूक बेटांची संस्थेमार्फत चांगल्या प्रकारे देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असल्याने पुढील तीन वर्षाकरीता देखभाल व दुरूस्ती करणेस मुदतवाढ (नुतनीकरणास) देण्यात येत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. खांबित साहेब, सुशोभिकरण चांगल झाले पाहिजे. फिरुन येणाऱ्या लोकांना झाडे, फुले, झुडपे एकदम चांगली दिसली पाहीजे. आणि त्याची तशी चर्चा केले. मी स्वतः पाली बीचच्या मालकाशी याबाबतीत चर्चा केली. ते विकसित कसल्याच प्रकारच होत नाही. सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे. सचिव साहेब पुढील विषय घेण्यात यावा.

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती साहेब, परवानगीने बोलतो. आपल्याकडे साधारणतः ५ दिवसापूर्वी राज्य शासनाचे मुख्याधिकारी संवर्गातले डॉ. दिपक सावंत हे सहा. आयुक्त म्हणून हजर झालेले आहे. आता ते स्थायी समितीमध्ये हजर आहेत. तर कृपया सर्व स्थायी समिती सदस्यांना ते ओळख करुन देतात. आपल्याकडे सध्या रिक्त जागा ज्या दोन आहेत त्या शासनाकरिता आहेत.

**अनिल सावंत :-**

उपायुक्त तुम्ही आहात आणि दुसरे......

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

उपायुक्त तर मी आहे आणि सहा. आयुक्तांच्या दोन जागा आहेत. त्यापैकी एका जागेवर आता हजर झाले.

**अनिल सावंत :-**

त्यांना आता चार्ज कुठला दिला आहे?

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

त्यांना सध्या परिवहनचा चार्ज दिलेला आहो आणि शिक्षण विभाग आणि अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण.

**डॉ. दिपक सावंत :-**

मा. सभापती महोदय, सर्व सदस्य, मा. आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब तसेच सर्व कर्मचारी वर्ग, मी दिपक ज्ञानदेव सावंत मुख्याधिकारी संवर्ग मी या अगोदर वाशी नगरपरिषद याठिकाणी मुख्य अधिकारी म्हणून काम केलेले आहे. त्याचबरोबर उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये उपायुक्त म्हणून काम केलेले आहे आणि तुर्तच माझी बदली मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सहा. आयुक्त म्हणून झालेली आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या माहितीप्रमाणे सहा. आयुक्तांची मागणी आपण केलेली. तर शासनाने आपल्यावर बोजा घातला का? की आपण मागणी केलेली म्हणून पाठवलेलं आहे.

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

शासनाचा जो नियम आहे. दि. ०४/०५/२००६ चा जो जी.आर. आहे त्याप्रमाणे आपल्याला पॅटर्न ठरवून दिलेले आहे. त्यानुसार २ जागा सहा. आयुक्तांच्या जागा या शासकीय अधिका-यांमार्फत शासन भरते. मग त्याच्याप्रमाणे त्यांनी एका अधिका-याला पाठवल आहे अजून एक अपेक्षित आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्यांनी एकव का पाठवला. २ अधिकारी का नाही पाठवले?

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

हे रायटींगमध्ये होते म्हणून त्यांच झाले दोन का नाही पाठवल कारण अता सर्व बदल्यांवर तुर्ताच निर्बंध आहे. कारण जनगणनेचे बरेच सी.ओ. संवंर्गातले लोक जनगणनाचे चार्ज ऑफीसर म्हणून आहे. म्हणजे पूर्ण शहराचे चार्ज ऑफीसर असल्यामुळे त्यांच्या बदल्यांना सध्या तरी प्रतिबंध आहे.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही आता जणगणनेचे बोलतो तर मी विचारतो की आपल्याकडे जणगणना चालू आहे त्याच्यावर कोण अधिकारी आहे?

**सुधीर राऊत (उपायुक्त (मु.)) :-**

श्री. विजय पाटील.

**अनिल सावंत :-**

त्यांनी परिवहनचा चार्ज घेतला का? पुढच्या अंदाजपत्रकात परिवहन प्रॉफीटमध्ये आणायची आहे.

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, आपल्याकडे दिपक सावंत साहेब हे सहा. आयुक्त म्हणून आलेले आहेत. तर मी स्थायी समितीच्या सदस्यांच्यावतीने त्यांचे या ठिकाणी स्वागत करतो. पण साहेब, एक गोष्ट अशी पण आहे की, आज आम्हाला या महानगरपालिकेत सहा. आयुक्तांच्या २ पोस्ट आहेत. २००६ मध्ये आपल्याला जी.आर. आला. तेव्हापासून आपण ते पद भरल नाही. आता २०१० साल आले आहे. तर शासनाकडून मधल्या पिरियडमध्ये आपल्याकडे का पाठवण्यात आली नाही? शासन आहे पण त्यांनी आपल्याकडे काही खुलासा केला का? आपल्याकडे मागणी आहे. आम्हाला या जागेची आवश्यकता आहे. आपण असे काही केलेले आहे का? साहेब एकतर कसे आहे की, आपल्या महापालिकेवर बोजा आहे. तुम्ही सांगता की, अजून एक जागा रिक्त आहे. परंतु, ती जागा भरण्यासाठी शासन आपल्याला विदाऊट विचारता पाठवते की, आपण त्यांच्याकडे मागणी करतो. आपण इकडे तसे काहीतरी केले पाहिजे की, आम्हाला जर आवश्यकता नसेल जर रिक्त जागा असेल तर मागवून काय फायदा?

**प्रकरण क्र. १२ :-**

भाईंदर (प.) उड्डाणपूल रस्त्यावरील पाली बिच रिसॉर्ट यांनी स्वखर्चाने विकसित करुन देखभाल व दुरुस्ती करीत असलेला वाहतुक बेट ३ वर्ष कालावधी करिता नुतनीकरण करणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १० :-**

भाईंदर (प.) पाली बिच रिसोर्ट, पाली चौक रोड, उत्तन यांना महानगरपालिका हद्दीत उड्डाणपूल उतरल्यावर टॉवरपर्यंत भाईंदर (प.) येथे वाहतूक बेट विकसित करुन देखभाल व दुरुस्ती करणे. व त्यांनी मोबदल्यात सदर ठिकाणी संस्थेची जाहिरात करणे बाबत इकडील मनपा/साबां/१०५३/०४-०५ दि.४/६/०४ परवानगी दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समिती दि.५/६/२००७ ठराव क्र.४२ नुसार पुढील तीन वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात आले आहे. करारनाम्यातील अटीशर्तीचे पाली बिच रिसोर्ट यांनी पालन केले असून सदर वाहतूक बेटांची संस्थेमार्फत चांगल्या प्रकारे देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असल्याने पुढील तीन वर्षाकरीता देखभाल व दुरूस्ती करणेस मुदतवाढ (नुतनीकरणास) देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत मोदी** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविणेस मान्यता देणे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहब, प्रकरण क्र. १३ मध्ये माझी एक सुचना आहे. ओशियन पॅलेस बिल्डींग का, इसका पूर्ण......

**चंद्रकांत मोदी :-**

साहब ठराव के पहले मेरा विनंती है। मैने बांधकाम विभाग को एक लेटर दिया था। की, शांती नगर परिसर मे काफी ग्राउंड है। इसमे सेक्टर १०, ७, ३ मतलब सभी जगह पर ग्राउंड है, अंधेरा है वहॉ चर्सी लोग बैठके चैन पुर्सी का काम काम करते है। तो मैन लाईट का मागणी किया था। तभी मुझे जवाब दिया की, शांती नगर हमारे अंडर मे हॅन्डओव्हर हुआ नही है। वहॉ पर गटर बनता है, रोड बनता है, सबकुछ बनता है। तो लाईट क्यों नही हो सकती है?

**हेलन गोविंद :-**

वॉर्ड क्र. २९ मध्ये डोंगरी आणि धावगी डोंगर, चौक येथे पाहणी केली जात नाही. पण याच्यामध्ये मेन्शन केले नाही ते मेन्शन करुन घ्या.

**मा. सभापती :-**

खांबित साहेब, हेलन मॅडमचा विषय पण इथे समावेश करुन घ्या आणि याच्यामध्येच मंजूरी द्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आणि माझी पण सुचना आहे ती पण समाविष्ट करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, घोडबंदर येथे संजय गांधी उद्यान लागु असल्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात चोऱ्या आणि वाघाचा पूर्ण वस्तीमध्ये शिरकाव होतो त्यामुळे तिथे व्हिल स्ट्रीट लाईट लावणे फार गरजेचे आहे. काही ठिकाणी फोकसची गरज आहे. आपले समाजमंदिर आणि मच्छी मार्केट आहे. हा फोकस लावलेला आहे. पण अजूनही चार-पाच फोकस लागतील. तसेच भाईंदर पश्चिम येथे आंबेडकर नगर, भोला नगर येथे सर्व्हे झालेला आहे. बहुतेक मला वाटते त्याला आपल्याकडून मंजूरीही मिळालेली आहे. तर तेथे ही फोकस आणि स्टीट लाईट तसेच भक्ती वेदांत, अस्मिता सुपर मार्केटकडून जाणारा जो रस्ता आहे तिथे मधल्या भागामध्ये स्ट्रीट लाईट नाही. तर त्या ठिकाणीही स्ट्रीट लाईट लावण्यात यावी.

**अनिल सावंत :-**

शांतीनगर येथे जे लाईट लावलेले आहेत ते फार जुने आहेत आणि कुठेही स्ट्रीट लाईट पडत नाही. सर्व अंधार आहे. तिथे पण रिप्लेसमेंट करा.

**हेलन गोविंद :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावणेकामी मे रिलायन्स एनर्जी लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली असून त्यानुसार खालील नमूद ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावणेकामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीला कळविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव |
|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बंदरवाडी गाव, चंदन पार्क येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पुनम सागर अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा व राई गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) स्टेशन रोड येथे पोल क्र.XUU ०२०/१८ डबल ब्रॅकेट करणे. |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रामदेव पार्क रोड अंतर्गत साई स्नेहा ते लवलेश इन्क्लेव्ह पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हॉली क्रॉस येथील पोल क्र. XUA ०८९/००३ डबल बॅक्रेट करणे. |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांतीधाम सृष्टी मिरारोड येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तन पातान बंदर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) चौक गाव उत्तन भाईंदर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) मिरा एम.आय.डी.सी. मिरा येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) राधास्वामी सत्संग येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) प्लेझंट पार्क व मिराधाम येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |

| | |
|---|---|
| १३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जया गार्डन हेतल पार्क संघवी नगर मिरारोड (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वैभव पार्क काशीमिरा रोड मिरारोड (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आर.एन.पी पार्क सरस्वती धाम भाईंदर (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) जनता नगर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) राईगाव येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) मधुरा इंडस्ट्रीज इस्टेट येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) नेहरु नगर व शास्त्रीनगर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) बालाजी नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माश्याचा पाडा काशीगाव येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड सेक्टर ०५ येथे महानगरपालिकेच्या शाळेजवळ व सेक्टर ६,९ शांतीनगर मिरारोड येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) कोकण सृष्टी म्हाडा हौसिंग कॉलनी येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावाणे. |
| २४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे हॅपीहोम शांतीपार्क येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तनगांव येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) सेक्टर नं.२ शांतीनगर येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट हनुमान मंदिर येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आर.एन.पी पार्क ओशियन व्हयु येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) आंबेडकर नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर साईनाथ सेवानगर येथे फोकस लावणे. |
| ३१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वार्ड क्र. २९,३० येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व.) शातीनगर परिसरातील स्ट्रीट लाईट पोल बदलणे. |

वरील प्रमाणे स्ट्रीट लाईट बसविण्या करीता मान्यता देण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना सडलेले पोल, बंद असलेले पोल त्वरीत बदलण्याबाबत तसेच रस्त्यामधील नाले, गटारे या मधील केबल्स, पिलर्स हटविणे बाबत सुध्दा कळविण्यात यावे. त्याकरिता कोणतीही रक्कम देण्यात येउु नये फक्त रिलायन्स एनर्जीचे मासिक देयक व फरकाची रक्कम मासिक समान हप्त्यात भरणा करण्यात यावी.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावणेकामी मे रिलायन्स एनर्जी लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली असून त्यानुसार खालील नमूद ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावणेकामी मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनीला कळविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव |
|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बंदरवाडी गाव, चंदन पार्क येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पुनम सागर अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा व राई गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) स्टेशन रोड येथे पोल क्र.XUU ०२०/१८ डबल ब्रॅकेट करणे. |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रामदेव पार्क रोड अंतर्गत साई स्नेहा ते लवलेश इन्क्लेव्ह पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |

| | |
|---|---|
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हॉली क्रॉस येथील पोल क्र. XUA ०८९/००३ डबल बॅक्रेट करणे. |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांतीधाम सृष्टी मिरारोड येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तन पातान बंदर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) चौक गाव उत्तन भाईंदर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) मिरा एम.आय.डी.सी. मिरा येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) राधास्वामी सत्संग येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) प्लेझंट पार्क व मिराधाम येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जया गार्डन हेतल पार्क संघवी नगर मिरारोड (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वैभव पार्क काशीमिरा रोड मिरारोड (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आर.एन.पी पार्क सरस्वती धाम भाईंदर (पूर्व) येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) जनता नगर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) राईगाव येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) मधुरा इंडस्ट्रीज इस्टेट येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) नेहरु नगर व शास्त्रीनगर येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) बालाजी नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माश्याचा पाडा काशीगाव येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड सेक्टर ०५ येथे महानगरपालिकेच्या शाळेजवळ व सेक्टर ६,९ शांतीनगर मिरारोड येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) कोकण सृष्टी म्हाडा हौसिंग कॉलनी येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) येथे हॅपीहोम शांतीपार्क येथे नवीन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तनगांव येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) सेक्टर नं.२ शांतीनगर येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट हनुमान मंदिर येथे नविन स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आर.एन.पी पार्क ओशियन व्हयु येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) आंबेडकर नगर येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर साईनाथ सेवानगर येथे फोकस लावणे. |
| ३१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वार्ड क्र. २९,३० येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व.) शातीनगर परिसरातील स्ट्रीट लाईट पोल बदलणे. |

वरील प्रमाणे स्ट्रीट लाईट बसविण्या करीता मान्यता देण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना सडलेले पोल, बंद असलेले पोल त्वरीत बदलण्याबाबत तसेच रस्त्यामधील नाले, गटारे या मधील केबल्स, पिलर्स हटविणे बाबत सुध्दा कळविण्यात यावे. त्याकरिता कोणतीही रक्कम देण्यात येऊ नये फक्त रिलायन्स एनर्जीचे मासिक देयक व फरकाची रक्कम मासिक समान हप्त्यात भरणा करण्यात यावी.

**सुचक :- श्रीम. हेलन गोविंद** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या हेलन गोविंद यांनी खालील सुचना मांडली.**

वॉर्ड क्र. २९ मध्ये डोंगरी आणि धावगी डोंगर, चौक येथे स्ट्रीट लाईट बसविण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या निर्मला सावळे यांनी खालील सुचना मांडली.**

घोडबंदर, भाईंदर पश्चिम येथे आंबेडकर नगर, भोला नगर, भक्ती वेदांत, अस्मिता सुपर मार्केटकडून जाणारा जो रस्ता आहे तिथे मधल्या भागामध्ये स्ट्रीट लाईट नाही. तर त्या ठिकाणीही स्ट्रीट लाईट लावण्यात यावी. तसचे शांतीनगर येथे जे लाईट लावलेले आहेत ते फार जुने आहेत आणि कुठेही स्ट्रीट लाईट पडत नाही. सर्व अंधार आहे. तिथे पण रिप्लेसमेंट करा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, भाईंदर (पूर्व) चौपाटी भाडे आकारणी बाबत.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे चौपाटीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करुन चौपाटी विकसित करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी नव्याने मैदाने तयार होत असून सदर मैदाने भाड्याने देण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये नियम ठरविण्यात आले होते. सदर ठिकाणी सद्यस्थितीत कार्यक्रमाकरीता रु. १०००/- प्रतिदिन भाडे आकारण्यात येते. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेला खर्च व होणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप पहाता सदर ठिकाणी असलेली मैदाने रु. ५,०००/- प्रति दिन प्रति मैदान या दराने भाड्याने देण्यास व रु. १०,०००/- अनामत रक्कम घेण्यास तसेच संबंधितांनी काही नुकसान केल्यास त्याची रक्कम देखील वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सध्या तयार करण्यात येत असलेले मैदान फक्त मुलांना खेळण्याकरीता ठेवावे. मैदान वापरण्याकरीता दिलेल्या परवानगीच्या एक दिवस अगोदर मंडप असल्यास त्याचे काम सुरु करावे. त्यापेक्षा आधी कामास सुरुवात केल्यास मंजूर दराने भाडे आकरण्यात येईल.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, इस ठराव को मेरा विरोध है। यह ठराव है क्या? फक्त मुलांना खेळण्याकरीता तुम्ही बोलता. दुसरा पाच हजार रु. भाडा बढा रहे है। इसमे नक्की करने का क्या? अभी अपने मिरा भाईंदर मे......

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब जर असे केले ना तर काही ठराविक व्यवसाय करतात आणि नागरीकांना खुलं ठेवणार नाही. पण तुम्ही थोडं महाग ठेवले नाही तर वाटेल......

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, उधर हमलोग जो जो व्यवस्था देते है। चौपाटी मे हमलोग कार्यक्रम का चार्ज लेते है तो क्या क्या व्यवस्था देते है?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

जागा देतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

दुसरा

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

कुछ नही।

**मदन उदितनारायण सिंह :-**

बाकी के हम जो देते है उनका क्या रेट है? स्कुल का ग्राउंड देते है, स्कुल का हॉल देते है तो उनका क्या रेट है?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहब, इसका पिछला ठराव है ना।

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्य मदन सिंहजी वह मैदान अलग है और यह चौपाटी अलग है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मुझे मालुम है। लेकीन क्या है और चौपाटी क्या है?

**अनिल सावंत :-**

चौपाटी का ५,०००/- रु. किया है और डिपॉझीट है वह १०,०००/- किया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

हमको इसका विरोध है। अभी अपने मिरा भाईंदर मे दुसरा किधर ऐसा ऑडीटोरीअम स्टेज कुछ है ही नही। खाली एक चौपाटी ही जगह है जहॉ लोगो को आसानीसे कार्यक्रम करने मिलता है और उसका हम इतना ज्यादा भाडा बढायेंगे तो यह ठिक नही है। इस ठराव को हमारा विरोध है। इसपर भाडा नही बढना चाहिए।

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य मदन सिंहजी, प्रोग्राम करते है लेकीन इतना आज कही पर भी सस्ते मे मिलता नही।

**मदन उदितनारायण सिंह :-**

आप सुविधा क्या देते है?

**याकुब कुरेशी :-**

जगह का ही ५०००/- रु है। आज के तारीख मे भाईंदर मे जगह मिलना भी मुश्किल है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

नियम से ऐसा है की, वहॉ का एक रुपया भी हम वसुल नही कर सकते है। वह कलेक्टर की जगह है। उसको वसुल करने का परमिशन हमको है क्या?

**याकुब कुरेशी :-**

वह तो हमको हॅन्डओव्हर हुआ है ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

हॅन्डओव्हर किया लोगो की सुविधा के लिए। पैसा वसुल करने का राईट आपके पास है क्या? नही है। यह अनधिकृत वसुली करते है।

**याकुब कुरेशी :-**

अनधिकृत वसुली कैसे कर सकते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

कलेक्टरने हॅन्डओव्हर किया है उसका आदेश देखो।

**याकुब कुरेशी :-**

क्या आदेश?

**मदन उदितनारायण सिंह :-**

हमारे पास वसुली का आदेश नही है।

**याकुब कुरेशी :-**

अपने पास जगह हॅन्डओव्हर हुई है। अपने को जगह मिली है। अपनी मालकी है। उसपर कितना भाडा लेना है और कितना नही लेना है वह नक्की कर सकते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

जनता को हम कुछ भी ला देंगे क्या? आज हम कर बढा रहे है। पानी कर बढा रहे है और अब यह भी बढा रहे है।

**अनिल सावंत :-**

खाजगी संस्था आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जनता नही करती है क्या?

**अनिल सावंत :-**

जनता किधर ऐसी बडी बडी संस्था है जो उधर कार्यक्रम करती है। वहॉ से स्टॉल देती है। उसका पैसा लेती है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

ऐसा कुछ नही होता है।

**अनिल सावंत :-**

होता है।

**याकुब कुरेशी :-**

वहॉ पे सोर्स ऑफ इन्कम है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

कुछ इन्कम नही है। वह सामाजिक और धार्मिक कार्यक्रम होते है। इन्कम के लिए नही होते है।

**याकुब कुरेशी :-**

धार्मिक कार्यक्रम होते है ना तो उसके लिए क्यो है वही रखो ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो ऐसा कहॉ है।

**याकुब कुरेशी :-**

जहॉ पे प्रायव्हेट होता है।

**जुबेर इनामदार :-**

सब सामाजिक और धार्मिक पर ही तो चलता है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

देणगी कौन देता है? जनता देती है। इस ठराव को हमारा विरोध है। इसपर इतनी भाडेवृत्ती नही होनी चाहिए।

**प्रविण पाटील :-**

फक्त चौपाटी पुरते नका ठेवू. कारण आपण फक्त चौपाटीवर खर्च नाही केला आहे. अशी बरीच मैदाने आहेत जिथे आपण खर्च केलेला आहे. हा नियम तुम्ही सगळ्या ठिकाणी लावा ना. तुम्ही असे करा की, महानगरपालिकेची सगळी मैदाने आहेत त्यांना एक धोरण ठरवा. स्क्वेअर फुटप्रमाणे किंवा स्केवर फुट प्रमाणे तुम्ही भाडे ठरवा.फक्त चौपाटीलाच एवढ भाडे......

**मदन उदितनारायण सिंह :-**

बाकी के जो मैदान है उसका हम क्या भाडा देते है।

**प्रविण पाटील :-**

दुसर महत्वाच अस आहे की, आज आपण चौपाटीला खर्च केलेला आहे म्हणून आपण भाड वाढवल. आज काशिमिरा रोड आहे. तिथे कुठल्या पक्षाचे कार्यक्रम करतात. तर एक बाजूचा रोड बंद करतो. तर त्याच भाड आपण काय आकारतो?

**मदन उदितनारायण सिंह :-**

उसका हमलोग क्या भाडा लेते है? लोगो को कितना तकलिफ होता है। उसका रोड का भाडा लेते है क्या?

**मा. सभापती :-**

आपल्याकडे चौपाटीचा विषय आला. आपण चौपाटीचा विषय घेतला. बाकीच्या बाबतीमध्ये आपण कुठली मैदान आहेत त्याच किती भाड आहे? त्याची आपण माहिती घेवू. कमिशनर साहेब आल्यानंतर. त्या विषयाच पण आपण करू शकतो. परंतु, आज.......

**मदन उदितनारायण सिंह :-**

सिर्फ चौपाटी का विषय क्यो लाये? जितने आरक्षण है उन सबका तयार करो किसका क्या भाडा रहेगा। उस हिसाब से विषय लाओ। खाली चौपाटी का ऐसा अन्याय क्यो हो रहा है?

**मा. सभापती :-**

आता आपल्याकजे शासनाकडून चौपाटीचा विषय आलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

शासनाचा आदेश आहे का?

**मा. सभापती :-**

प्रशासनाकडून आपल्याकडे आलेला आहे. तर तो गरजेचा विषय आहे ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

या भाववाढीचा आम्ही विरोध करतोय.

**मा. सभापती :-**

हा विषय बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नाही। इसका मै ठराव रखता हूॅ। मिरा भाईंदर पूर्व चौपाटी भाडे आकारणी करण्यात आलेली भाडेवाढ ही अन्यायकारक असून सदर ठरावाला आमचा विरोध आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आपण दोन्ही ठरावावर मतदान घेवू.

(सभागृहात गोंधळ )

**जुबेर इनामदार :-**

चौपाटी हे लोगो के लिए। और लगा देते है १५-१५ दिन उधर। लोगो को इधर बेनिफिट नही चाहिए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

१५ दिन लगाने क्यो देते है? उसके लिए अपने अधिकारी जिम्मेदार है।

**जुबेर इनामदार :-**

१५ दिन का ५ हजार से कितना हो गया? तो बराबरसे २ दिन मे कार्यक्रम खतम करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

१५ दिन का है तो वह १५ दिन का भाडा देते है।

**जुबेर इनामदार :-**

१००० के हिसाब....

**मदन उदितनारायण सिंह :-**

जो रेट हे उसी से देते है ना। पूरे शहर मे जितने आरक्षण है उस सभी का रेट निश्चित करो ना। खाली चौपाटी काही क्यो बढा रहे है। मिरा भाईंदर मे नई जगह नही उसके लिए वहॉ होता है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

अगर, आप वैसा रखते है तो रोज प्रोग्राम वहॉपर होगा।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फिर कहॉ जायेंगे? दुसरी जगह कहॉ है? दुसरी जगह डेव्हलप करो।

**चंद्रकांत मोदी :-**

पार्टी प्लेटपे २५-३० हजार रू. भाडा है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

चौपाटी का अगर कम भाडा रखते है तो वहॉपर रोज प्रोग्राम होंगे। फिर लागोको चौपाटी का लाभ क्या मिलेगा?

**मदन उदितनारायण सिंह :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, चौपाटी का लाभ क्या मिलेगा यह अधिकारीयो से पुछो। अधिकारीयोने चौपाटी को चौपाटी तरह रहने दिया है क्या?

**जुबेर इनामदार :-**

चौपाटी लागो के सुविधा के लिए बनाई है।ठहलने के लिए, घुमने के लिए बनाई है। कार्यक्रम करने के लिए नही बनाई है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपको आज चौपटी की क्या स्थिती है यह मालूम है क्या?

**जुबेर इनामदार :-**

नही है। लेकिन अच्छी को बनेगी ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

स्थिती क्या है? हमारा विरोध है। चौपाटी को चौपाटी ही रहनी चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

जो धर्म नामपर कार्यक्रम करते है ना वह लोग करोडो रू लाते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वह करोडो कमाते है, कितना भी देंगे। लेकिन महानगरपालिका धोरण निश्तिच होना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

त्या ठरावामध्ये माझी सुचना आहे की, डिपॉझिट २५,०००/- रू. करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक अनिल सावंत, अनुमोदक बर्नड डिमेलो, दुसरा ठराव सुचक मदन सिंग, अनुमोदन प्रविण पाटील असे दोन ठराल आलेले आहेत. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानात टाकतो. मिरा भाईंदर पूर्व चौपाटी भाडे आकारणी करण्यात आलेली भाडेवाढ ही अन्यायकारक असून सदर ठरावाला आमचा विरोध आहे असा मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हातवर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे चौपाटीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करुन चौपाटी विकसित करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी नव्याने मैदाने तयार होत असून सदर मैदाने भाड्याने देण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये नियम ठरविण्यात आले होते. सदर ठिकाणी सद्यस्थितीत कार्यक्रमाकरीता रु. १०००/- प्रतिदिन भाडे आकारण्यात येते. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेला खर्च व होणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप पहाता सदर ठिकाणी असलेली मैदाने रु. ५,०००/- प्रति दिन प्रति मैदान या दराने भाड्याने देण्यास व रु. १०,०००/- अनामत रक्कम घेण्यास तसेच संबंधितांनी काही नुकसान केल्यास त्याची रक्कम देखील वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सध्या तयार करण्यात येत असलेले मैदान फक्त मुलांना खेळण्याकरीता ठेवावे. मैदान वापरण्याकरीता दिलेल्या परवानगीच्या एक दिवस अगोदर मंडप असल्यास त्याचे काम सुरु करावे. त्यापेक्षा आधी कामास सुरुवात केल्यास मंजूर दराने भाडे आकरण्यात येईल. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हातवर करायचा आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हातवर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

भाईंदर पूर्व चौपाटी भाडे आकारणी बाबत. प्रकरण क्र. १४ हा ठराव अनिल सावंत यांच्या बाजूने १० मते आणि विरोधामध्ये ३ मते ठराव बहुमताने मंजूर करण्य़ात येत आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

भाईंदर (पूर्व) चौपाटी भाडे आकारणी बाबत.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे चौपाटीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करुन चौपाटी विकसित करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी नव्याने मैदाने तयार होत असून सदर मैदाने भाड्याने देण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये नियम ठरविण्यात आले होते. सदर ठिकाणी सद्यस्थितीत कार्यक्रमाकरीता रु. १०००/- प्रतिदिन भाडे आकारण्यात येते. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेला खर्च व होणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप पहाता सदर ठिकाणी असलेली मैदाने रु. ५,०००/- प्रति दिन प्रति मैदान या दराने भाड्याने देण्यास व रु. १०,०००/- अनामत रक्कम घेण्यास तसेच संबंधितांनी काही नुकसान केल्यास त्याची रक्कम देखील वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सध्या तयार करण्यात येत असलेले मैदान फक्त मुलांना खेळण्याकरीता ठेवावे. मैदान वापरण्याकरीता दिलेल्या परवानगीच्या एक दिवस अगोदर मंडप असल्यास त्याचे काम सुरु करावे. त्यापेक्षा आधी कामास सुरुवात केल्यास मंजूर दराने भाडे आकरण्यात येईल.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. दिनेश नलावडे<br>२) श्री. अनिल दिवाकर सावंत<br>३) श्री. याकुब इस्माईल कुरेशी<br>४) श्री. जुबेर इनामदार<br>५) श्री. चंद्रकांत मोदी<br>६) श्री. चंद्रकांत म्हात्रे<br>७) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद<br>८) श्री. बर्नड डिमेलो<br>९) श्रीम. निर्मला सावळे<br>१०) श्रीम. सुधा व्यास | १) श्रीम. वर्षा भानुशाली<br>२) श्री. प्रविण पाटील<br>३) श्री. मदन उदितनारायण सिंह | निरंक |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, भाईंदर (प.) शाळा इतारतीवर शेड बांधणे व मिरारोड उर्दु शाळा सुरु करणे करीता बांधकाम खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**याकुब कुरेशी :-**

भाईंदर (प) येथे महानगरपालिकेची शाळा गृह इमारत असून सदर इमारतीच्या टेरेसवर लिकेज आहे. सदर इमारतीवर त्याकरीता शेड बांधण्याची मागणी शिक्षण विभागाने केली आहे. सदर शाळा क्र. ३१ मध्ये नैसर्गिकरित्या वाढ झाल्याने वर्ग कमी पडत असून शेड बांधल्यास त्यामध्ये तात्पुरत्या स्वरूपात वर्ग सुरू करता येईल. त्याकरीता रू. १८,४३,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

तसेच मिरारोड येथे उर्दू शाळा सुरू करावयाची मागणी असून तात्पुरत्या स्वरूपात प्रभाग कार्यालय सुरू असलेल्या इमारतीत पहील्या मजल्यावर जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी ५ वर्गाकरीता बांधकाम केल्यास शाळा सुरू होवु शकेल. त्याकरीता रू. ६,४९,५००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही कामे करण्यासाठी तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**निर्मला सावळे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, मिरा भाईंदर मध्ये अशी बऱ्याच शाळा आहेत ज्याची परिस्थिती आमची भाईंदरची २६ नंबरची शाळा आहे.

**याकुब कुरेशी :-**

विषय द्या. घेवून टाकू.

**प्रविण पाटील :-**

दिलेल आहे. प्रशासनाने कधी विषय नाही आणला. या दोनच शाळा आहे का? नवघरची शाळा आहे. तिथे पाण्याची टाकी नाही, गळते आमचा विषय कधीच आणला नाही. त्याच्यावर माझा पत्रव्यवहार किती झालेले आहे.

**दिपक खांबीत :-**

दुरूस्ती करून घेवू.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

भाईंदर (प.) शाळा इतारतीवर शेड बांधणे व मिरारोड उर्दु शाळा सुरु करणे करीता बांधकाम खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १३ :-**

भाईंदर (प) येथे महानगरपालिकेची शाळा गृह इमारत असून सदर इमारतीच्या टेरेसवर लिकेज आहे. सदर इमारतीवर त्याकरीता शेड बांधण्याची मागणी शिक्षण विभागाने केली आहे. सदर शाळा क्र. ३१ मध्ये नैसर्गिकरित्या वाढ झाल्याने वर्ग कमी पडत असून शेड बांधल्यास त्यामध्ये तात्पुरत्या स्वरूपात वर्ग सुरू करता येईल. त्याकरीता रू. १८,४३,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

तसेच मिरारोड येथे उर्दू शाळा सुरू करावयाची मागणी असून तात्पुरत्या स्वरूपात प्रभाग कार्यालय सुरू असलेल्या इमारतीत पहील्या मजल्यावर जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी ५ वर्गाकरीता बांधकाम केल्यास शाळा सुरू होउु शकेल. त्याकरीता रू. ६,४९,५००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही कामे करण्यासाठी तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी** **अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, मिरारोड येथील रक्तपेढीसाठी आलेले निविदांचे दर मंजूर करणेबाबत.

**अनिल सावंत :-**

रक्तपेढी बांधुन आपण लायसन्स घेवून पानपट्टे साहेब किती दिवस झाले?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

मा. महासभेत ठराव मंजूर झाला होता.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेला मंजूर कधी झाला? ११ फेब्रुवारी.......

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

मार्च – एप्रिल मध्ये झाला आहे.

**अनिल सावंत :-**

कसं आहे की, या सबबमध्ये कुठेही चांगली रक्तपेढी नाही. आण ही रक्तपेढी लवकरात लवकर सुरू होणे फार गरजेचे आहे. वॉर्ड रूम आपण बांधून ठेवला आहे. तिथे १६ पेट्या आहेत. वर्ष झाल. त्या आता सडल्या असतील. अजून चालू नाही केल. ए.सी.युनिट लावून ठेवलेल आहे ते पण बंद झाल असेल. त्या दिवशी आपल्या म्युनिसिपाल्टीच्या कर्मचाऱ्याच्या मुलासाठी कुठे पेटी मिळेना.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

दि. ७/०१/२०१० ला मा. महासभेत ठराव झाला होता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

वह ठराव क्या हुआ था ?

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही विषय आणायच्या आधी चौकशी केली नव्हती का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

चौकशी केली होती.

**अनिल सावंत :-**

आता ह्याच्या निविदा आल्या आहेत. याच्या व्यतिरिक्त कारण कस आहे की, ही जी चांगल्या प्रकारची शहरामध्ये रक्तपेढी व्हावी. हा या मागचा उद्देश आहे. त्याच्यामध्ये या व्यतिरिक्त आणखीन काही निविदा तुमच्या जवळ आलेल्या आहेत का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

निविदा नाही आल्यात. त्यांचे प्रपोजल तुमच्या जवळ आलेल्या आहेत का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

निविदा नाही आल्या. त्यांचे प्रपोजल आलेले आहे. त्यांनी निविदेमध्ये भाग घेतला नव्हता. त्याचे प्रपोजल चांगले असल्यामुळे फेरनिविदा काढून त्यांचा पुन्हा पाठनिशी करायला सांगा.

**अनिल सावंत :-**

पण, त्यांना याच्यामध्ये तुम्ही इन कॉरपोरेट करून निगोसेशन करू शकता का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

तस नाही करता येत.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्तांना अधिकार दिले तर!

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

नाही करता येत टेंडर प्रोसेस फॉलो व्हायला पाहिजे. त्याशिवाय नाही होणार.

**अनिल सावंत :-**

मग, त्याच्यासाठु एक वर्ष परत जाईल.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

लगेच उद्या मी निविदा करतो. दुसरे काही चार प्रपोजल आलेले आहेत. त्यांना पुन्हा कॉम्पीटिशन.....

**मदन उदितनारायण सिंह :-**

याच्यामध्ये दोन रेट दिलेले आहे इफ मन्शनरी प्रोव्हाईड, इफ मेन्शनरी नॉट प्रोव्हाईड मा. महासभेत नेमका ठराव काय झाला आहे?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

दोन्ही मागवा म्हणून सांगितल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्या मा. महासभेचा ठराव फक्त आपण जागा देणार. सगळी मशिनरी त्यांनी प्रोव्हाइडेड करायच.

**अनिल सावंत :-**

अस नाही झाल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

असाच झाला आहे.

**अनिल सावंत :-**

आमचाच ठराव झाला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जरी तुमचा ठराव असेल. तरी तुम्ही ठराव बघा काय ते.

**अनिल सावंत :-**

बघा ना.मशिनरी महापालिकेने द्यायची. २ प्रकारे आहे. एक मशिनरी महापालिका देणार. आणि दुसरी मशिनरी ब्लड बॅक देणार. दोन्ही प्रकारचे रेट मागवायचे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

फक्त एन.जी.ओ. ला द्या अस फक्त झाला होता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हो जागा द्या. मशिनरी द्यायच नाही.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

तुम्ही ठरवा काय ते. दोन्ही रेट मागावायचे. फक्त एन,जी.ओ.कडून मागवू. त्याबद्दल ठराव झाला होता.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे यावेळी चूक झाली. प्रशासनाने जी चूक केली ज्यांचा तुम्ही एकतर याच्यामध्ये नवजीवन रिलिफ फाऊंडेशनचे दर सर्वांत कमी आहे. त्याच्याकडे स्वतःची ब्लड बॅक नाही. निट चौकशी करून लवकरात लवकर म्हणजे जमेल तेवढ्या लवकर गरज लागली तर विशेष बैठक बोलवा.

**अनिल सावंत :-**

तुम्ही रक्तपेढी कधी चालू करणार?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

उद्याच इ-टेंडरिंग काढणार. पुन्हा ७ दिवसा नंतर फायनल होईल.

**दिपक खांबित :-**

साहेब, चालू झाले तर तुम्ही एक व्हिजीट मारा.

**अनिल सावंत :-**

आजच जावू. ते मॉर्चरी लवकरात लवकर चालू करा.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब, आपण आज किती महिन्यापासून ब्लड बँकचे काम करतो. तिकडे सगळे तयार झालेले आहे. तुमच्यामुळे एवढा उशीर.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब, माझ्यामुळे नाही उशीर झालेला आहे. मधे आचारसंहिता होती.

**मा. सभापती :-**

साहेब, तुम्ही आचारसंहितेमध्ये बाकीचे काम करु शकला असता ना. आता ह्याच्यामध्ये काय प्रॉब्लेम येतो.

**अनिल सावंत :-**

पानपट्टे साहेब, त्या ब्लड बँकेची सर्व परमिशन आले.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

हो. परमिशन सर्व आली.

**अनिल सावंत :-**

आतमध्ये तुमचे सर्व इंटरनल पूर्ण आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

हो पूर्ण आहे. बाकीचे इक्वीपमेंट पूर्ण आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

हो पूर्ण आहे. बाकीचे इक्वीपमेंट घेणार तो एन.जी.ओ. घेणार.

**अनिल सावंत :-**

ते आपण ठरवू. ते महापालिका ठरवणार एन.जी.ओ. घेणार की आपण आपण घेणार आणि मॉर्चरीचे काय झाले?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

सगळी परमिशन आली आहे. फक्त परवानगी राहिलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोणत्या कारणाने ही निविदा मंजूर करत नाही?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

स्वतःची ब्लड बँक नाही.

**अनिल सावंत :-**

मॉर्चरीची कसली परमिशन बाकी आहे?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब, स्वतःची निविदा नाही.

**निर्मला सावळे :-**

हा विषय स्टॅन्डीगमध्ये आणायलाच नाही पाहिजे होता.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

चालवण्यासाठी सिव्हील सर्जनची परमिशन लागते ना.

**डॉ. चकोर :-**

मॉचरी चालु करण्यासाठी सिव्हील सर्जनची परमिशन लागते.

**अनिल सावंत :-**

सिव्हील सर्जन कुठून? ठाणे?

**डॉ. चकोर :-**

त्याचे आपण पत्रव्यवहार केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

कधी केलेला आहे?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

दोन वेळेस रिमायन्डर पण केलेले आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही पत्र कधी पाठवलेले आहे?

**डॉ. चकोर :-**

साहेब, तुम्हाला त्याची माहिती देतो.

**अनिल सावंत :-**

२ वर्ष झालेले आहे आपण तिथे करोडो मशिनरी लावलेली आहे, ए.सी. लावलेले आहेत, मॉर्चरीच्या पेट्या लावलेल्या आहेत. शहरामध्ये किती हालत आहे. १२ लाख पॉप्युलेशन आहे. कुठेही मॉराक्रोम नाही. त्यांनी तुम्हांला काही सांगितले का? ते परमिशन का देत नाही?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

क्युरीज कपलाईन केलेले आहे ते आता होईल. आम्ही दोन वेळा जावून आलो आहोत तर आता होईल.

**अनिल सावंत :-**

कधी होईल? नाहीतर सिव्हील सर्जनकडे मला घेवून चला.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

दोन्ही होईल.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब तुम्ही या बाबतीमध्ये मोघम उत्तर देवू नका. ब्लड बँकच्या बाबतीत या शहरातल्या लोकांना फार अडचणी होत आहे. आपली जागा वगैरे सर्व तयार आहे. आपण मशिनरीसाठी मंजूरी पण दिली. मशिनरी आली पण आणि तुमची बाकीची प्रोसीजर होत नाही.

**अनिल सावंत :-**

एक वर्ष झाले मशिनरी घेऊन.

**मा. सभापती :-**

तुम्ही लोक लक्ष देत नाही का? आम्ही मंजूरी वगैरे देवून मशिनरी वगैरे काही तुम्ही करता काय? ब्लड बँकच्या बाबतीत तुमची तयारीच होत नाही. तुम्ही आमच्याकडे आज हा विषय दिला. त्याच्यामध्ये तुम्ही आज आम्हाला सांगता की ह्यांची स्वतःची ब्लड बँक नाही. तुम्ही अगोदर काय चौकशी केली.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

ट्रस्टची बँक आहे, स्वतःची नाही.

**मा. सभापती :-**

प्रॉब्लेम आहे ना. आज आपण मंजूरी देवू शकत नाही ना मग परत पुढे विषय गेला. पुढच्या सभेमध्ये तुम्ही आमच्यासमोर फेरनिविदा काढून हा विषय पुन्हा आणावा. पुढील विषय घेण्यात यावा.

(मा. सभापती सो. आदेशाने सदर विषय तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, निविदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**जुबेर इनामदार :-**

| अ.क्र. | कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च/ दर |
|---|---|---|
| १. | भाईंदर (प.) येथे फाटक रस्त्यवरील दुल्हन महल अपार्टमेंट ते नगरभवन पर्यंत गटार तयार करून फुटपाथ तयार करणे.<br>अ) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**ब) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन** | रू. ३८,०१,२००/-<br><br>३.००% जास्त दराने<br>**९.००% कमी दराने** |
| २. | भाईंदर (पूर्व) खारीगांव सत्यनारायण मंदिरा जवळ नाट्य रंगमंच बांधणे. (नगरसेवक निधी)<br>अ) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>ब) मे. ललित कंन्स्ट्रक्शन<br>**दरवाटाघाटीनंतर** | रू. २८,३९,०००/-<br><br>२०.००% जास्त दराने<br>१४.९०% जास्त दराने<br>**९.९०% जास्त दराने** |
| ३. | भाईंदर (प.) भगतसिंग गार्डन मधील कबाना तयार करणे. (फेर निविदा)<br>अ) मे. कलाकृती<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>ब) मे. श्रध्दा एन्टरप्राईजेस<br>क) मे. शिल्पयान | रू. १०,००,०००/-<br><br>रू. १०,५०,०००/-<br>**रू. ९,८०,०००/-**<br>रू. १२,१०,०००/-<br>रू. १०,७८,०००/- |
| ४. | मिरारोड एन.एच.हायस्कूल नाका ते रसाझ पर्यंत रस्ता उंच करणे.<br>**अ) मे. एम.एस. एन्टरप्राईजेस** | रू. ४९,४०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | ब) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | **१४.०५% कमी दराने**<br>अंदाजपत्रक दराने |
| ५. | आरक्षण क्र. ३२६. ट्रक टर्मिनल या जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयास प्रशिक्षणासाठी दोन रूम बांधणे.<br>**मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.** | रू. १४, ७४,५००/-<br><br>**अंदाजपत्रक दराने** |
| ६. | मा. स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांचा अंदमान निकोबार येथे अभ्यास दौरा आयोजित करणे.<br>**अ) मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स**<br>ब) मे. फ्लॅग ट्रॅव्हस सर्व्हिस<br>क) मे. सड्र्स द ट्रॅव्हल | रू. १७,३८,०००/-<br><br>**रू. ७९,०००/-** प्रती नग<br>रू. ८४,५००/- प्रती नग<br>रू. ८०,४००/- प्रती नग |

वरीलपैकी अ.क्र. १ च्या कामी मे. गुरूजी कंन्सट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.००% कमी दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामी मे. ललित एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.९०% जास्त दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामी मे. कलाकृती यांची रू. ९,८०,०००/- रकमेची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. एम.एस. एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १४.०५% कमी दराची निविदा, अ.क्र. ५ च्या कामी जिल्हा मजूर सोसायटी यांनी शिफारस केलेली मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ६ च्या कामी मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स यांची रू. ७९,०००/- प्रति नग दराची निविदा यांना मान्यता देणात येत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १७ :-**

निविदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १४ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव/ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च/ दर |
|---|---|---|
| १. | भाईंदर (प.) येथे फाटक रस्त्यवरील दुल्हन महल अपार्टमेंट ते नगरभवन पर्यंत गटार तयार करून फुटपाथ तयार करणे.<br>अ) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**ब) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन** | रू. ३८,०१,२००/-<br><br>३.००% जास्त दराने<br>**९.००% कमी दराने** |
| २. | भाईंदर (पूर्व) खारीगांव सत्यनारायण मंदिरा जवळ नाट्य रंगमंच बांधणे. (नगरसेवक निधी)<br>अ) मे. एकता कंन्स्ट्रक्शन<br>ब) मे. ललित कंन्स्ट्रक्शन<br>**दरवाटाघाटीनंतर** | रू. २८,३९,०००/-<br><br>२०.००% जास्त दराने<br>१४.९०% जास्त दराने<br>**९.९०% जास्त दराने** |
| ३. | भाईंदर (प.) भगतसिंग गार्डन मधील कबाना तयार करणे. (फेर निविदा)<br>अ) मे. कलाकृती<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>ब) मे. श्रध्दा एन्टरप्राईजेस<br>क) मे. शिल्पयान | रू. १०,००,०००/-<br><br>रू. १०,५०,०००/-<br>**रू. ९,८०,०००/-**<br>रू. १२,१०,०००/-<br>रू. १०,७८,०००/- |
| ४. | मिरारोड एन.एच.हायस्कूल नाका ते रसाझ पर्यंत रस्ता उंच करणे.<br>**अ) मे. एम.एस. एन्टरप्राईजेस**<br>ब) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रू. ४९,४०,०००/-<br><br>**१४.०५% कमी दराने**<br>अंदाजपत्रक दराने |
| ५. | आरक्षण क्र. ३२६. ट्रक टर्मिनल या जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयास प्रशिक्षणासाठी दोन रूम बांधणे.<br>**मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.** | रू. १४, ७४,५००/-<br><br>**अंदाजपत्रक दराने** |
| ६. | मा. स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांचा अंदमान निकोबार येथे अभ्यास दौरा आयोजित करणे.<br>**अ) मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स**<br>ब) मे. फ्लॅग ट्रॅव्हस सर्व्हिस<br>क) मे. सड्र्स द ट्रॅव्हल | रू. १७,३८,०००/-<br><br>**रू. ७९,०००/-** प्रती नग<br>रू. ८४,५००/- प्रती नग<br>रू. ८०,४००/- प्रती नग |

वरीलपैकी अ.क्र. १ च्या कामी मे. गुरूजी कंन्सट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.००% कमी दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामी मे. ललित एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.९०% जास्त दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामी मे. कलाकृती यांची रू. ९,८०,०००/- रकमेची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. एम.एस. एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १४.०५% कमी दराची निविदा, अ.क्र. ५ च्या कामी जिल्हा मजूर सोसायटी यांनी शिफारस केलेली मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ६ च्या कामी मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स यांची रू. ७९,०००/- प्रति नग दराची निविदा यांना मान्यता देणात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये ४ नंबरचा विषय आहे. घोडबंदर, रेतीबंदर अंतर्गत रस्ते याच्यामध्ये महिना झाला लादया लावून आणि आता लाद्या सर्व निघाल्या आणि अर्धवट काम आहे. हे माझ्या फंडातून झालेले आहे आणि ते अर्धवट काम आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, अवलोकनामध्ये ३२ नंबरचा विषय आहे तो काढावा लागेल. तर ते काय रद्द करण्यात यावे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १८ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प) वॉर्ड क्र. ३२ मध्ये विविध गल्ल्यांना पेव्हरब्लॉक बसविणे व तुटलेल्या गटारांवर नविन स्लॅब टाकणे. | रू. ९,९५,०००/- | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २ | उत्तम कुंभारवाडा येथे जेरल डिसुजा घर ते मुख्य गटारावरील सी.सी. गटार बांधणे. | रू. २,१९,६७५/- | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | भाईंदर (प) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात पाण्याची टाकी बांधणे. | रू. ३,०१,३००/- | मे. साकडबाव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | घोडबंदर रेतीबंदर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करून पेव्हर ब्लॉक बसविणे. | रू. ७,१७,६००/- | मे. श्रीरंग मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.मुरबाड, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (पूर्व) विभागातील गटारावरील आर.सी.सी. स्लॅब दुरूस्ती करणे. | रू. ६,६४,८००/- | मे. साईस्मित मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ६ | प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयाकरीता भुमिगत गच्चीवरील पाण्याची टाकी बांधणे. | रू. २,२१,८००/- | मे. संदेश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | भाईंदर (पूर्व) बंदरवाडी व नवघर येथिल आरोग्य केंद्रात दुरूस्ती करणे. | रू. ७,५०,३४७/- | मे. विठ्ठलकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ८ | मिरारोड काशीगांव विनायकनगर येथील आरोग्य केंद्रात दुरूस्ती कामे करणे. | रू. ५,८१,१५३/- | मे. बावघर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ९ | भाईंदर (पूर्व) चौपाटी येथिल विधी कार्यशेड समोर जलवाहतुकी साठी सिमेंट कॉक्रीटचा धक्का बांधणे. (नगरसेवक निधी) | रू.१०,००,०००/- | मे. ओमअभिनव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. .जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्साज सिनेमा येथील व कनकिया येथील प्रभाग कार्यालय येथे विदयुत फिटींग व इतर आवश्यक कामे करणे. | रू. ६,२८,१४९/- | मे. शर्मिली आदि मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, .जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ११ | भाईंदर (पूर्व) एस.एम. पब्लिक स्कूल येथून मणिभद्र नगरकडे जाणा-या नाल्यावर स्लॅब टाकणे. | रू. १८,०००/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| १२ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १८ मधील साधूराम हॉटेल समोर नाल्यावर झाकण बसवून स्लॅब टाकणे. | रू. १९,६००/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| १३ | भाईंदर (प) लेक व्हयू सोसायटीच्या समोरील गटार तयार करून स्लॅब टाकणे. | रू. ४९,८००/- | मे. यश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| १४ | भाईंदर (प) राधा वल्लभ ते स्पॅन हाईट टॉवर पर्यत गटार तयार करणे. | रू. ९,९९,५००/- | मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. .जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १५ | भाईंदर पश्चिम आय.डी.बी.आय बँकेच्या मागे सभागृह बांधणे. (आमदार निधी ) | रू. १०,००,०००/- | मे. शुभलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. डहाणू .जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १६ | भाईंदर (प) आरक्षण क्र. १०० उदयान विकसित करणे. (आमदार निधी ) | रू. १०,००,०००/- | मे. यशोधन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड .जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १७ | भाईंदर पश्चिम देवकीनंदन इमारतीस समोरील रस्ता व गटार तयार करणे. (आमदार निधी ) | रू. ५,००,०००/- | मे. नवलाई मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १८ | उत्तन भाटेबंदर येथील इश्वरकृपा घराशेजारील उघडया गटारास आर.सी.सी. गटार बांधणे. | रु.५,००,०००/- | मे. सोहम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी , जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १९ | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल पोस्ट मॉर्टम रूम मध्ये कडप्पा कपाटे व पोस्टमार्डम टेबल व इतर वाढीव कामे करणे. | रू. ९,९७,२००/- | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २० | भाईंदर (पूर्व) बी.पी रोड साईबाबा मंदिरा पासून महादेव मंदिर ते व्यंकटेश्वर नगर व महादेव नगर ते शिवलिंग बिल्डर्स केबिन रोड पर्यंत सील कोट टाकणे. | रु.५,०२,१००/- | मे. गणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २१ | भाईंदर (पूर्व) राजवी पॅलेज अपार्टमेंट समोर सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू. ३,७१,६०० /- | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जि. ठाणे. | |
| २२ | भाईंदर (पूर्व) विकास उदयोग नगर ते रावल नगर, नर्मदा नगर नाल्यापर्यत नाला बांधून स्लॅब टाकणे. | रु. ४,६०,२०० /- | मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २३ | मा. महापौर निवास स्थानात रंगकाम व इतर काम करणे. | रु. २,००,००० /- | मे. गणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २४ | भाईंदर (पूर्व) गोविंद स्मृती इमारती मागे गटार बांधणे व गोविंद नगर ते नाकोडा पर्यत गटार दुरूस्ती करून स्लॅब टाकणे. | रु. ४,९८,००० /- | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २५ | भाईंदर (पूर्व) किरण नगर नाल्यावर संरक्षण लोखंडी रेलिंग बसविणे. (आमदार निधी) | रु. ७,२५,००० /- | मे. शिवअमृत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २६ | भाईंदर (पूर्व) विध्यवासीनी बिल्डींग पासून मातोश्री बिल्डींग पर्यत नाल्यावर चेकर्ड लादी बसविणे व सुशोभिकरण करणे. (आमदार निधी) | रु. ७,०५,००० /- | मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २७ | मिरारोड शांतिनगर से. २ डी – ३ ते सी – ३० ते अे – १८ पर्यत गटार बांधणे. | रु. १०,००,००० /- | मे. चिंतामणी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २८ | मिरारोड शांतिनगर से. ८ मधील सी – ३७, सी – ३६ पर्यत गटार बांधणे व स्लॅब टाकणे व से. ७ मधील अंतर्गत गटारे बांधणे. | रु. ६,१७,००० /- | मे. शुभलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १६ मधील सदविचार को.ऑप. व ईशा बी विंग या इमारती समोर पेव्हर ब्लॉक बसवून कांचनमृग इमारती समोरील क्रॉसिंगवर स्लॅब टाकणे. | रु. ५,००,००० /- | मे. आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३० | भाईंदर (पूर्व) नर्मदा नगर रोडवरील साई सागर इमारती लगतच्या नाल्याचे बांधकाम करून स्लॅब टाकणे | रु. ९,९८,००० /- | मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३१ | मिरारोड वॉर्ड क्र. ५३ मधील सना अपा. ते सेंट हॅरिस स्कूल, आनंद पॅराडाईज, स्वरूप आयेशा अपा. गटारावर स्लॅब टाकणे. | रु. ६,२३,०५० /- | मे. रिफ्युजी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३२ | मिरारोड परिसरात बगिच्यांची दुरूस्ती करणे, गटारावर स्लॅब टाकणे व स्लॅबची दुरूस्ती करणे व चेकर्ड लादया बसविणे. | रु. ९,८०,००० /- | मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३३ | मिरारोड सिंगापूर प्लाझा समोरील गटार बांधणे, स्लॅब टाकणे व झाकणे बसविणे. | रु. २,६९,५०० /- | मे. जयशिवराय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३४ | मिरारोड शांतिनगर से. ८ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व आर.सी.सी. बसविणे. | रु. ४,१२,६०० /- | मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३५ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील समर्थकृपा बंगल्यापासून सोलंकी पार्क पर्यत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. ९,९७,२०० /- | मे. जयशिवराय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | भाईंदर (पूर्व) सर्व्हे क्र. २०९ या जागेत सामाजिक सभागृह बांधणे.<br>(नगरसेवक निधी) | रू. ८,७२,०००/- | मे. शरप्रभा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |

वरील पैकी अ.क्र. १ ते ३६ या कामाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी जो विषय आणला होता तो विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव**

सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांच्याकडून २(के) चा प्रश्न आलेला आहे. प्रकरण क्र. १९, मिरा भाईंदर शहरामध्ये दैनंदिन सफाई, कचरा उचलणे व नालेसफाई करणाऱ्या ठेकेदारांच्या असमाधानकारक कामकाजावर अंकुश व नियंत्रण आणणेसाठी निर्णय घेणे. या विषयाला सगळ्यांची मान्यता आहे का?

**मा. सभापती :-**

हा विषय सर्वांच्या मान्यतेने घेण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवागीने बोलतो. दि. ०१/०७/२००९ रोजी मा. महासभेमध्ये एक धोरण ठरल या शहरामध्ये शहराचा रोजचा निघणारा कचरा, नालेसफाई, शहराची रसोची सफाई करतो. त्याच एक धोरण प्रशासनाने ठरवल. त्यांना गटामध्ये विभागल. या शहराच्या ७९ वॉर्डला २४ गटामध्ये विभागल आणि ते काम ठेकेदारामार्फत त्यांचेच मजूर असतील, त्यांचीच मशिनरी असेल, त्यांचेच लोक, त्यांचेचे साहित्य. ते घेवून २४ गटामध्ये घेवून साफसफाई करतात. आज दि. २४/०२/२०१० रोजी म्हणजे स्थायी समितीने या निविदांना मंजूरी दिली. त्या दिनांकापासून वारंवार आम्ही या विषयावर मा. आयुक्त साहेबांकडे तक्रार करतो. साहेब, तुम्ही ठेकेदाराला हे जे काम दिलेले आहे. ते समाधानकारक ते काम करत नाही. मनुष्यबळ एका वॉर्डमध्ये पूर्वी जेव्हा आपण महापालिका ठेक्यावर मजूर पुरवठा घेवून काम करत होती. तेव्हा प्रत्येक वॉर्डमध्ये कमीत कमी १५ कर्मचारी तरी होते. १५-२०, १५-२० कर्मचारी तरी असायचे. आज त्या ठेकेदाराने ५-६ कर्मचारी तरी असायचे. आज त्या ठेकेदारने ५-६ कर्मचारी घेवून त्यांनी त्या पूर्ण वॉर्डची सफाई करायची. म्हणजे ते काम करणारे सफाई कर्मचाऱ्यांनी जीव मरेपर्यन्त काम करायच. ते काम करू शकत नाही. आणि त्या वॉर्डची सफाई होत नाही. अधिकाऱ्यांना वारंवार या विषयावर तक्रार करत आहोत. मा. महासभेमध्ये जेव्हा ठराव मांडण्यात आला त्या ठरावाम्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. ठेकेदाराने सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवायचे. गणवेशावर गट क्र. असायला पाहिजे. त्या ठेकेदाराच कंपनीच नाव असायला पाहिजे. याचा सुध्दा मी लेखि तक्रार आयुक्तांकडे आणि आरोग्य अधिकाऱ्यांकडे मी केलेली आहे. आज दिनांकापर्यन्त सुध्दा त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मा. महासभेने केलेला धोरमात्मक निर्णय ठरावाच्या माध्यमातुन त्याची अंमलबजावणी होत नाही. याला कारणीभुत कोण? ठेकेदार की अधिकारी? वर्षामध्ये २ वेळा नालेसफाई झाली पाहिजे. वर्षामध्ये त्यांचा ठेका झाला सुरू केला. प्रथम दर्शनीय समोर आलेल आहे ते पाऊस पावसाच्या आधी शहरामधले असलेले छोटे गटारी व नाले त्यांची सफाई होणे गरजेचे आहे. आजपर्यंत सफाई झालेली नाही. मग, शहर यावेळी बुडणार. सांगताना म्हणतात मी माझ काम केल तुमचा ठेका तुम्ही घेतलेला आहे. तो एक ठराविक क्षेत्रापर्यन्त आहे. पुढच्या ठेकेदाराने ती नालेसफाई केली नसली तर हे पाणी पुढे जाईल का? अशाप्रकारे हे काम चालेल आहे. या शहरामध्ये मा. सभापती साहेब, आपण लोक प्रतिनिधी आहोत, नगरसेवक आहोत. लोक आपल्याला निवडून देतात. उद्या या शहरामध्ये अजून पाऊस पडलेला नाही. तरी या शहराने इतिहास बघितलेला आहे. पाणी भरण्याचा. या शहरामध्ये ४-४, ५-५ फुट पाणी बऱ्याच ठिकाणी भरतो. सखल विभाग या शहरामध्ये आपल्याकडे कमी नाही. नालेसफाई झाली नाही. तर हे शहर बुडेल याच्यात वाद नाही. गेल्यावर्षी तत्कालीन आयुक्त जाधव साहेब त्यांनी खरोखरच चांगल काम केल. गेल्यावर्षी पाऊस ही कमी पडला होता. मात्र या वर्षी काही सांगता येत नाही. ते नैसर्गिक आहे. आंध्रामध्ये सायक्लॉन येवून गेला. परमेश्वराची कृपा असेल तर पाऊस व्यवस्थित पडेल. आपण हे ही बोलू शकत नाही. आजच्या तारखेमध्ये पाऊस कमी पडेल किंवा जास्त पडेल हे तुम्ही आणि मी बोलू शकणार नाही. आपण जे करू सकतो ते आपल्याला केल पाहिजे. तर माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयाबद्दल गांर्भिय पूर्वक विचार करावा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता सन्मा. सदस्य इनामदार साहेबांनी जे सांगितले की, प्रत्येक ठेकेदार त्याच्यातुन पाणी जात नाही. तिथे दुसरा ठेकेदार ाहे. ठेकेदाराचीच नाव सांगुन मोकळा होतो. मग, साफसफाई कोणी करायची. आता

तुम्ही सांगा पावसाळा आला आहे. पेपरला पण आलेल आहे की ८ तारखेला पाऊस येणार तर ८ तारखेला पाऊस येणार.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, या गोष्टीसाठीच हा विषय जुबेर साहेबांनी स्टॅण्डींगमध्ये घेतलेला आहे. आपण त्याच्यावर विचार करायचा आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. सभापती साहेब, तुम्हाला सांगु इच्छितो की, सर्व कर्मचाऱ्यांना माहित आहे की दरवर्षी ७ जून ही पावसाची तारिख असते, तरी देखील नेहमी हा विषय आणावा लागतो. सांगावा लागतो. २-४ महिन्या अगोदर कारवाई का नाही करत? ही जबाबदारी नाही का?

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, अधिकाऱ्यांना विचारा की, ठेकेदारांचा करारनामा झाला आहे का? जर झाला असेल तर त्याची प्रत स्थायी समिती समितीमध्ये मागवून घेण्यात यावी.

**राजकुमार कांबळे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, पहिला विषय गणवेशा बद्दल आहे. तर त्याबद्दल मा. आयुक्त साहेबांनी सभा लावली होती. त्या अनुषंगाने ज्या-ज्या कॉन्ट्रॅक्टरने काम नाही केली. त्यांना प्रतिदिवस ५ हजार आणि ज्यांचे काम झाले नाही त्यांना ५ हजार या प्रमाणे दंडाची आकारणी करण्याचे आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे ज्यांचे ज्यांचे काम झालेले नाही. त्यांच्यावरती डे टू डे ची रक्कम वजा करणार आहोत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तुम्ही दंड आकारणार पण लोक आमच्या तोंडात माती घालतील त्याच काय? तुम्ही दंड आकारून नगरपालिकेचा फायदा कराल. जर, काम झाले नाही तर लोक आम्हाला नगरसेवक म्हणून शिव्या घालतात. त्याच काय? मला काय म्हणायच आहे तुम्ही दंड आकाराल त्यांच्यावर कारवाई कराल लोक आमच्या तोंडात माती घालतील त्याच काय? तुम्हाला आम्ही निवडून दिलेले आहे. तुम्ही काय करतात? त्यांना उत्तर कोण देणार. त्याच सांगा ना. मग आम्ही कोणाला शिव्या द्यायच्या? तुम्हाला शिव्या द्यायच्या का?

**मा. सभापती :-**

याच्यासाठी आपण आपला ठराव मंजूर करतो. ज्यावेळी तुमच्याकडे अधिकारी येतात तुमच जो पर्यंत सर्टीफिकेट त्यांना जात नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, कोणी अधिकारी येत नाही. ठराव करणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :-**

तर याच्यासाठीच तुम्हाला अधिकार प्राप्त करून देतो.

**बर्नड डिमेलो :-**

आता कांबळे साहेबांनी सांगितल की, दंडाची रक्कम वजा करून त्यांना पेमेंट देण्यात येईल. ते पेमेंट देवूच नये. त्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे प्रतिनिधीच तुम्हाला पत्र भेटत नाही की, व्यवस्थित सगळं, निचरा, कचरा काढण्यात आला आहे. प्रभागामध्ये संपूर्ण काम झालेले अहे. तर त्यांचे पेमेंट देण्यात यावे. अस घ्याना.

**राजकुमार कांबळे :-**

घेणार ना. प्रत्यक्ष घेणार.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

दंडात्मक कारवाई नाही. त्यांनी पूर्ण पेमेंटच देवू नये. दंडात्मक कारवाई करून काही होणार नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी जो ठराव आणलेला आहे. तो ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

राऊत साहेब, दंदात्मक कारवाई करून काही होणार नाही. त्या पूर्ण पेमेंटच द्यायच नाही. आणि त्यांनी सर्व नगरसेवकांना येवून सुपर व्हाईजरने विचारल पाहिजे. तिथे जो कोणी विभागीय अधिकारी असेल की, साफसफाई योग्य झालेली आहे की नाही, नगरसेवक जेव्हा पत्र देईल त्यावेळेला तुम्ही त्याच पेमेंट करायच. अन्यथा पेमेंट करू नये.

**मा. सभापती :-**

तुमच्या वॉर्डमधून जे नैसर्गिक नाले जातात. आता काम चालू आहेत तर तुम्हाला तिकडे ठेकेदार बोलवतात का? किंवा तुम्ही तिकडे त्या नाल्यावर जावून पाहणी करता का?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बोलवलच नाही तर जाणार कुठे?

**मा. सभापती :-**

आपण लक्ष द्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नविन कोण ठेकेदार आला आहे तो आम्हाला माहितच नाही.

**मा. सभापती :-**

आपल लक्ष रहायला पाहिजे. आपण त्यांच्यावर अवलंबून रहायला नाही पाहिजे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ठेकेदार कोण आहे तो माहिती पाहिजे को नको?

**मा. सभापती :-**

तुम्ही अजून माहिती घेतली नाही?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कोणतरी बोलतो की नारायण ठेकेदार आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, आपण अस जर बोललो की, ठेकेदार कोण आहे मला माहित नाही. तर याच्यामद्ये मग, आपली चूक होईल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब तिथे विभागीय अधिकाऱ्यांना विचारून माहिती घ्या. आम्ही खैरे कडून माहिती घेतो.

**मा. सभापती :-**

आता पण माहिती घ्या. त्याच्यावर पाहणी करा. नालेसफाई झाली, नाही झाली काय आहे? आपणच लक्ष दिलं पाहिजे. त्यांनी सांगावं मग आपण लक्ष द्यावं असं नाही करायचं.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ठेकेदारांचा फोन लागत नाही. तुमचं म्हणणं काय आहे बोला.

**मा. सभापती :-**

कांबळे साहेब, तुमचे ठेकेदार कोण आहेत ज्याचे फोन नाही लागत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

नारायण चा लागत नाही.

**मा. सभापतीः-**

तुम्ही रायटींग मध्ये इकडे तक्रार करा.

**राजकुमार कांबळे :-**

मी तुम्हाला त्यांच्या नावाची यादी देतो.

**जूबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगी ने बोलतो. मा. महासभेमध्ये धोरण ठरवलं होतं. प्रत्येक नगरसेवकांनी दिलेल्या पत्राचं उत्तर मागितलं होतं. मा. आयुक्त साहेबांनी उत्तर दिलं नाही. माझ्या प्रत्येक पत्रात टिप टाकतो केलेल्या कारवाईचं लेखी स्वरुपात उत्तर देण्यात यावे. त्या अधिकाऱ्यांना विचारा, आरोग्य विभाग अधिकाऱ्यांना त्यांनी मला किती पत्राची उत्तर आजपर्यंत दिली. अधिकारी देत नाही, मा. आयुक्त साहेब उत्तर देत नाही.

**मा. सभापतीः-**

उपायुक्त साहेब, पानपट्टे साहेब, आज तुम्ही या ठिकाणी आहात. मान्सुन ८ दिवसांवर आलेला आहे. पाऊस वेळेवर येणार हे निश्चित. वेग शाळेने असे दर्शविले की, कदाचित ३०,३१,१ तारखेपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता आहे. आणि या गोष्टीची आपल्या सर्वांनाच माहिती असेल पहिला पाऊस तर एवढा मोठा पडतो की न भुतो न भविष्यती आणि त्याला भरती असेल तर अतिशय खराब हालत या ठिकाणी होईल. ३-४ वेळेला मिरा भाईंदर शहरामध्ये सगळे कारखाने वगैरे डुबलेले. ते सुध्दा पहिल्या पाऊसामध्ये याची सर्वांनाच माहिती आहे. तुम्ही या गोष्टीची सर्वांनी नोंद घ्या. आणि तुम्ही लक्षं नाही दिलं आरोग्य डिपार्टमेंट आहे ते ठिक आहे. त्याचं हमेशाचं रडगाणं चालूच असतं त्याच्याकडुन आम्हाला समाधानकारक काम कधीच मिळालेलं नाही. आणि कॉन्ट्रॅक्टवाल्यांनी नगरसेवकांना विचारात घ्यायला नको का? ज्या ठिकाणी काम चालू आहे. तेव्हा त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्टरने तिकडच्या नगरसेवकांना कॉन्टॅक्ट केलं पाहिजे ना. आमचं इथे काम चालू आहे तुम्ही पाहणी करण्यासाठी इथे या हे असं का होत नाही?

**चंद्रकांत मोदी :-**

कमिश्नर साहब ने दो दिन पहले प्रॉमिस किया था की, चार दिन के अंदर सृष्टी ब्रिज जो है पोलिस स्टेशन सृष्टी से लेके ब्रिज तक जो मिट्टी गिरा है वहाँपर ४०० ट्रक मिट्टी गिरी है। और पहली बारीश आयेगी तभी पूरा मिरा-भाईंदर डुबेगा। क्योकीं पानी जाने का रास्ता वही है। आयुक्त साहब बोले मैने देखा। साहब आपने उधर देखा की, वहॉपर ४०० ट्रक मिट्टी पडा है।

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सा़ो) :-**

भरणी टाकलेली आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

भरणी किधर है? वह भरणी नही है।

**मा. सभापती :-**

ते का झालं की नाही? ते लेवल वगैरे केलं की नाही?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सा) :-**

वहाँ मा. महापौर साहब, मै और आयुक्त साहब कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, नगररचनाकार, प्रभाग अधिकारी क्र.२,३ हमने खुद जाके २१ तारखेला आपली मिटींग झाली की, आपत्कालीन आढावा घ्यायचा. त्याच्यामध्ये मा. आयुक्त महोदयाने निर्णय दिला की त्यांना दर दिवसाला दंडात्मक रक्कम करा आणि त्या ठेकेदारांना अशा इंन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत की, त्यांनी कुठल्याही परिस्थिती मध्ये मेज्युरीटी काम हे ३१ मे च्या आत आटपायच असा आढावा घेण्यात आलेला आहे. आणि त्या व्यतिरीक्त मला जेवढं शक्य आहे तेवढं सर्वात महत्वाचे मोठे-मोठे नाले ते मी समक्ष जाऊन पाहून आलेलो आहे. आणि त्या संदर्भात संबंधीत आरोग्य विभागाला मी कळवलेले आहे. त्याचप्रमाणे आज सुध्दा मी काही नाले पाहून आलो. त्याची सुध्दा मी नोंद घेतलेली आहे आणि त्या नोंदी प्रमाणे दररोज मी त्यांना इंर्न्फाम करतो. त्या व्यतिरीक्त त्यांच्या कामावर सुध्दा अल्टीमेटली सुपरविजन करण्याची जी जबाबदारी आहे. ती माझ्या परिने मी पार पाडतो आणि त्या परिने मी जास्तीत जास्त त्यांच्याकडुन आऊटपुट घेण्याचा प्रयत्न करेन असे मी स्वतः माझ्या वतीने सांगु इच्छितो अन्यथा आरोग्य विभागाचे जे ठेकेदार आहेत त्यांच्या बाबतीत जर त्यांनी काही डीफॉल्ट केलेलं आहे. आपण एक दंडात्मक ठेवलेली आहे. दुसरी मा. सदस्यांची सुचना आहे की, त्यांना पेमेंट च करु नये.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब मैने इनामदार साहब ने तक्रार अनेक बार किया है। मट्टी अभी तक उधर से हिलाया नही।

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सा) :-**

यह तो आप ४०० ट्रक भराव का बोल रहे है। हमने ऐसे कुछ भराव देखे, जो मैने मा. महापौर साहब के निर्देशन मे आये पूराने जमाने ये घोडबंदर का सर्व्हे नं.१२ यानी की यहां के नवघर का सर्व्हे क्र.२२० वगैरे रहेगा। वहाँ अपना पुराना जो खोची या पारंपारीक पाणी जाने का प्रभाव वहा जो मिट्टी भरी है वह कमसे कम १२ से १५ हजार ट्रक मिट्टी इतना भराव हो गया है। पूरा का पूरा आने जाने का जो प्रवाह है वह माती के ट्रक ने पूरा बंद किया है। जो आप ४०० ट्रक की बात कर रहे है मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्र मे ऐसे हजारों ट्रक का भराव आज के तारीख मे मिट्टी का हुआ है। सिर्फ खाजगी जमिन की नही है। शासकीय जमिन का भी भरणी है। जो शासकिय जमिन उदा. सर्व्हे नं. ७६,७७, सर्व्हे नं. ७१,७२ मिरागांव का ऐसे शासकीय जमिन पर भी बहोत बडे पैमाने मे भरणी हुई है। और अगर वह भरणी ठिक तरह से नही रुकी तो मिरा भाईदर का जैसे की आप बोल रहे है बरसात मे भविष्य सिर्फ यह नालेसफाई तक की बात सिमित नही है। यहाँ निर्णय इस बात का भी होना चाहिए की मिट्टी के ट्रक अभी मिट्टी के ट्रक के खिलाफ हमने २-३ गृहविभाग ने और पोलिस विभाग ने कारवाई की तो उस कारवाई मे ऐसे नजर आया की उनके पास एमएमआरडीए के वहाँ के जो रस्ते हो गये है उसका पूरा कचरा वह वहाँ डाल रहे है। शिल्ड जो है वहाँ रस्ते और गटर के जो काम हो रहे है। एमएमआरडीए का जहाँ चेंम्बूर मे हो रहे है, भांडुप में हो रहे है। मुलुंड मे हो रहे है। मलाड मे हो रहे है। उसका पूरा मुंबई का कचरा समेटनेका इस कॉर्पोरेशन का काम है क्या? उन्होंने हमे यह दिखाया। हमारे पास परमिट है।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, एक बात सुनिए। जाफरी खाडी है यह रोड है। लाखो करोड रु. रोड पे बनाया है। रोड पे मट्टी डाला है वह मे बात करता हूँ। बारीश आएगी तो मिट्टी कहाँ पर जाएगी।

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सा) :-**

रोड मट्टी है तो उसके बारे मे हम सुचना देंगे। लेकीन यह जो पारंपारिक......

**चंद्रकांत मोदी :-**

और अपने आरोग्य अधिकारीनेही डाला है यह भी मे आपको बताता हूँ। पूरे शहर का मट्टी उधर ही डाला है।

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)सा) :-**

आपको मे दिखाना चाहता हूँ। पुरे शहर के नाले का सर्व्हे है। उसमेसे मैने अभी एक सर्व्हे नं. देखा है। ११ नंबर का नाला है वहापर पूरा भराव किया है। सर्व्हे नं. देखा है। ११ नंबर को नाला है वहापर पूरा भराव किया है। सर्व्हे नं. ३०१ पूरी सरकारी जमिन है। हमने जो जाके देखा है सिर्फ नाला नही नाले की सफाई बाजू मे......

**चंद्रकांत मोदी :-**

साहब हम समझ गये। हम इधर ४० साल से रह रहे है।

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, आमची समस्या काय आहे ती बघून घ्याना. त्याच्यावर तुम्ही उत्तर काय देणार?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, जाफरी खाडीमध्ये जर साफसफाई झाली नाही. कचरा काढला नाही तर लोकांच्या घरामध्ये पाणी जाईल.

**राजकुमार कांबळे :-**

दोन महिन्यापूर्वी तिथे गेलेले परंतु तिथे धोकादायक आहे. आणि सगळ्याच गोष्टी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आजपर्यंत तो कचरा तिथेच आहे. कचरा टाकणे गुन्हा आहे. कचरा उचलणे गुन्हा आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

जाफरी खाडी मार्गे जे टाकलेल आहे तिथे साफ झालेल नाही. तुम्ही जावून बघा.

**राजकुमार कंबळे :-**

साहेब, करतो.

**चंद्रकांत मोदी :-**

कधी?

**निर्मला सावळे :-**

सभापती साहेब, पुनम सागरच्या मागचा जर कचरा उचलला नाही. पुढे बंदिस्त गटार आहे. तर तो पूर्ण कचरा, माती गटारात वाहत जावून अडकेल. आणि त्यामुळे गटाराचे स्लॅप तोडावे लागेल. आपली पावसाळ्यात अशी परिस्थिती येईल. तो कचरा एक दोन दिवसात उचलून घ्याना. इतर विषयावर तुम्ही चर्चा करतात इतर इतर विषयावर......

**चंद्रकांत मोदी :-**

कांबळे साहेब, आंबेडकर रोड पासून गटार साफ झालेल नाही, आंबेडकर रोड, सेक्टर नं. ५ पासून...

**चंद्रकांत मोदी :-**

काम तो किधर भी चालू नही किया है।

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, अधिकारी असे उडवा-उडवीची उत्तर देतात तर त्याच्यावर पर्याय काय? तो कचरा किती दिवसात उचलणार? त्याचा काहीतरी शोध लावा ना.

**मा. सभापती :-**

कांबळे साहेब, सावळे मॅडमची समस्या बघा. म्हात्रे साहेबांची समस्या काय ते बघा. आणि मोदी साहेबांची समस्या पण बघा आणि लिहून घ्या. आणि तुम्ही केव्हापर्यंत काम करणार?

**चंद्रकांत मोदी :-**

दुसरा विषय यह है की, जो कॉन्ट्रॅक्टर को ठेका दिया है ना, उसके पास आदमी कम है। तो जो छोटा दो अढाई फुट का गटार है वह जे.सी.बी. लेकर करनेके लिए आया था तो उसने पुरा गटर तोड दिया है। अभी डबल लॉस हुआ। बांधकाम विभाग गटर बनाती है......

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, त्या कॉन्ट्रॅक्ट वाल्याच्या दर हाजरीमुळे त्यांच्यामुळे नुकसान झाल असेल तर त्यांच्याकडून दंड करून घ्या. ते जे गटर तुटलेल आहे ना ते त्यांच्याकडून बांधून घ्या. ती त्यांची जबाबदारी आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मुंबई मधुन एमएमआरडीए जी मातीचा भराव इथे टाकते अणि त्यांच्याजवळ म्हणता की परमिट आहे. मग, महापालिका त्याच्या विरूध्द काय करते?

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर शहर सुमारे ७९.०० चौ.कि.मी. क्षेत्रफळ एवढे आहे. शहरामध्ये बरेचसे नैसर्गिक नाले व त्यात होत असणारे पावसाचे व सांडपाणी वाहून नेणारे बरेच नाले व गटारे आहेत. या शहराची लोकसंख्या १० लाखाच्या आसपास असून दररोज ३५० ते ४०० टन कचरा औद्योगिक रहिवासी क्षेत्रामधून उत्पन्न होतो. दैनंदिन शहरामधून निघणारा कचरा गोळा करुन त्याची विल्हावाट लावणे, नाले गटाराची सफाई, रस्त्याची सफाई करणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. भुतकाळामध्ये महानगरपालिकेचे स्थायी सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून त्यानंतर ठेका मजदूर वार्षिक ठेक्यावर देवून शहर स्वच्छ ठेवण्याचे कामकाज प्रशासन चालू ठेवते. सन २०१०-११ महानगरपालिका प्रशासनाने सुचविल्याप्रमाणे शहराच्या ७९ वॉर्डात २४ गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटात सुचविल्याप्रमाणे असतील तेवढ्या वॉर्डामध्ये दैनंदिन साफसफाई, कचरा गोळा करणे व वर्षातून दोन वेळा नालेसफाई करणे कामाचा विषय मा. महासभेपुढे ठेवला. दि. ०१/०७/२००९ रोजीच्या महासभेमध्ये प्रशासनाने सुचविलेल्या गटाप्रमाणे कामकाजाच्या धोरणात्मक निर्णयाला ठराव क्र. १७ च्या माध्यमातून मान्यता दिली. ठरावात स्पष्टरित्या मांडण्यात आले आहे. प्रत्येक गटाचे ठेकेदार दररोज रस्त्याची साफसफाई, कचरा गोळा करणे व वर्षातून दोन वेळा नालेसफाई करतील व प्रत्येक सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवतील व गणवेशावर ठेका घेणाऱ्या कंपनीचे नांव व गट क्रमांकाचा उल्लेख करतील.

नियमाप्रमाणे निविदा प्रसिध्दी करुन ज्या ठेकेदाराला पटेल त्या योग्य रक्कमा भरुन प्रशासनाने दिलेल्या अटीशर्तीला मान्य करुन वार्षिक सफाई कामाचा ठेका गटाप्रमाणे स्विकारुन व मा. महासभेच्या या ठरावाला अधीन राहून मा. स्थायी समिती दि. २५/०२/२०१० रोजी ठराव क्र. ११०, २४ गटांच्या निविदांना मंजूरी देण्यात आली मात्र आजमितीपर्यंत ठेकेदारांनी कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवलेले नाहीत. पावसाच्या आधी युध्दपातळीवर करण्यात येणारे नालेसफाईचे काम केलेले नाही व दैनंदिन सफाई व कचरा उचलणे कामी मनुष्यबळ कमी असल्या कारणाने सफाईचे काम समाधानकारक होत नसल्याचे दिसून येत आहे. वारंवार लोकप्रतिनिधी व रहिवासी सदर बाबत तक्रार मा. आयुक्तांच्या निर्दशनास आणून देतात. तथापी अशा असमाधानकारक काम करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करावी. वॉर्डामध्ये दैनंदिन सफाई, कचरा उचलणे, नालेसफाई करण्याचे काम समाधानपूर्वक झाल्याचे दाखले वॉर्डाच्या नगरसेवकांकडून घेतल्याशिवाय ठेकेदारांचे देयक रक्कम अदा करु नये असा मी ठराव मा. स्थायी समितीमध्ये मांडत आहे.

**निर्मला सावळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. जाफरी खाडी बद्दल मगाशी बरचस झाल. त्याच्याबद्दल मी तुम्हाला राईटींगमध्ये पत्र दिल आहे साफ करण्याविषयी. आणि जाफरी खाडीच्या दोन्ही बाजूला जाफरी खाडीवर रस्त्याला लागुनच फुटपाथवर रॅबिट माती दोन्ही पडलेल आहे. त्याच्यामध्मये आपल्या आरोग्य विभागाने सुध्दा माती टाकलेली आहे. ते जर आपण पावसापूर्वी उचलल नाही. जाफरी खाडीला दोन ब्रिज आहे. एक पोलीस चौकीला जाते. आणि दुसर जून ब्रिज ते जर उचलल नाही तर पूर्ण मातीच त्या जाफरी खाडीमध्ये जाणार. आणि आता आपण त्या ठिकाणी साफसफाई करून घेतलेली आहे. आणि तिथे जर रॅबिट वैगेरे पडल तर सर्व खाडी बुजून जाणार आहे. आणि त्या ठिकाणी मग काही कायदा होणार नाही, मिरारोडच पूर्ण शहरातल पाणी जाफरी खाडीमधून पूढे जात. ते जर गेल नाही तर पूर्ण रिव्हर्स मारेल. आण पूर्ण शहरामध्ये पाणी पाणी होवून जाईल.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. आता सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी स्टॅण्डींग मध्ये जो विषय आणला तो खरोखर मा. महासभेमध्ये स्टॅण्डींगचे नगरसेवक याविषयावर नेहमी चर्चा करतात. आणि प्रत्येक सदस्यांची लोकप्रतिनिधीची तळमळ असते. वॉर्डाची साफसफाई झाली पाहिजे. जनतेला चांगली सुविधा दिली पाहिजे. जनतेला चांगली सुविधा दिली पाहिजे. आणि जेव्हा चांगल्याप्रकारे काम होत तेव्हा नगरसेवकांना समाधान ही होत. परंतु, आज आम्हाला दुःख होत की, इथे लेखी अर्ज द्यावा लागला. या अशा पध्दतीने. कारण वारंवार चर्चा होवून आम्ही प्रत्यक्ष सविस्तर अधिकाऱ्यांना भेटून मागणी करून ही वॉर्डात साफसफाई होत नाही. आज पावसाळ्याचे दिवस येवून ठपले आहेत. कधीही नाले तुडूंब भरून शहरात पाणी साचू शकते. अशी परिस्थिती असताना जर सर्वांनी मिळून कामामध्ये पारदर्शकता आणली. प्रत्येकाने आपली जबाबदरी समजून जर काम केल तर हे काम चांगल होईल. ज्याप्रमाणे जुबेर साहेबांनी ठरावात सांगितल की, चेक अदा करू नये. पण, चेक अदा करण्याचा अधिकार कोणाला आहे. आणि हा काटेकोर जर आपण पाळला. गेला तर प्रत्यक्ष ह्याच्यामध्ये अधिकारी इनवॉल्ड असतात. अधिकाऱ्यांनी जर चेक इश्यु केले नाही तर पेमेंट आपोआप थांबवल जाईल.

**मा. सभापती :-**

ऑडीटर साहेब आज इथे नाही आहेत. तर राऊत साहेब त्यांना तुम्ही थोडी कल्पना द्या की, असा असा ठराव मंजूर झालेला आहे. जो पर्यंत नगरसेवकांचे लेटर त्यांना मिळत नाही तौ पर्यंत त्यांना पेमेंट अदा करू नये. आणि याच काटेकोरपणे पालन झाल पाहिजे.

**प्रकरण क्र. १९ :-**

प्रकरण २(के) अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर शहरामध्ये दैनंदिन सफाई, कचरा उचलणे व नालेसफाई करणाऱ्या ठेकेदारांच्या असमाधानकारक कामकाजावर अंकुश व नियंत्रण आणणेसाठी निर्णय घेणे.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर शहर सुमारे ७९.०० चौ.कि.मी. क्षेत्रफळ एवढे आहे. शहरामध्ये बरेचसे नैसर्गिक नाले व त्यात होत असणारे पावसाचे व सांडपाणी वाहून नेणारे बरेच नाले व गटारे आहेत. या शहराची लोकसंख्या १० लाखाच्या आसपास असून दररोज ३५० ते ४०० टन कचरा औद्योगिक रहिवासी क्षेत्रामधून उत्पन्न होतो. दैनंदिन शहरामधून निघणारा कचरा गोळा करुन त्याची विल्हावाट लावणे, नाले गटाराची सफाई, रस्त्याची सफाई करणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. भुतकाळामध्ये महानगरपालिकेचे स्थायी सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून त्यानंतर ठेका मजदूर वार्षिक ठेक्यावर देवून शहर स्वच्छ ठेवण्याचे कामकाज प्रशासन चालू ठेवते. सन २०१०-११ महानगरपालिका प्रशासनाने सुचविल्याप्रमाणे शहराच्या ७९ वॉर्डात २४ गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटात सुचविल्याप्रमाणे असतील तेवढ्या वॉर्डामध्ये दैनंदिन साफसफाई, कचरा

गोळा करणे व वर्षातून दोन वेळा नालेसफाई करणे कामाचा विषय मा. महासभेपुढे ठेवला. दि. ०१/०७/२००९ रोजीच्या महासभेमध्ये प्रशासनाने सुचविलेल्या गटाप्रमाणे कामकाजाच्या धोरणात्मक निर्णयाला ठराव क्र. १७ च्या माध्यमातून मान्यता दिली. ठरावात स्पष्टरित्या मांडण्यात आले आहे. प्रत्येक गटाचे ठेकेदार दररोज रस्त्याची साफसफाई, कचरा गोळा करणे व वर्षातून दोन वेळा नालेसफाई करतील व प्रत्येक सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवतील व गणवेशावर ठेका घेणाऱ्या कंपनीचे नांव व गट क्रमांकाचा उल्लेख करतील. नियमाप्रमाणे निविदा प्रसिध्दी करुन ज्या ठेकेदाराला पटेल त्या योग्य रक्कमा भरुन प्रशासनाने दिलेल्या अटीशर्तीला मान्य करुन वार्षिक सफाई कामाचा ठेका गटाप्रमाणे स्विकारुन व मा. महासभेच्या या ठरावाला अधीन राहून मा. स्थायी समिती दि. २५/०२/२०१० रोजी ठराव क्र. ११०, २४ गटांच्या निविदांना मंजूरी देण्यात आली मात्र आजमितीपर्यंत ठेकेदारांनी कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवलेले नाहीत. पावसाच्या आधी युध्दपातळीवर करण्यात येणारे नालेसफाईचे काम केलेले नाही व दैनंदिन सफाई व कचरा उचलणे कामी मनुष्यबळ कमी असल्या कारणाने सफाईचे काम समाधानकारक होत नसल्याचे दिसून येत आहे. वारंवार लोकप्रतिनिधी व रहिवासी सदर बाबत तक्रार मा. आयुक्तांच्या निर्देशनास आणून देतात. तथापी अशा असमाधानकारक काम करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करावी. वॉर्डामध्ये दैनंदिन सफाई, कचरा उचलणे, नालेसफाई करण्याचे काम समाधानपूर्वक झाल्याचे दाखले वॉर्डाच्या नगरसेवकांकडून घेतल्याशिवाय ठेकेदारांचे देयक रक्कम अदा करु नये असा मी ठराव मा. स्थायी समितीमध्ये मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने खरोखरच या शहराच नाव रोषण केल. महापालिका, महासभा असू दे किंवा इतर कार्यक्षेत्र असुदे त्यांचा जो दांडगा अभ्यस आणि मा. महासभेमध्ये प्रत्येक विषया विषयी असलेले सखोल ज्ञान, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे कार्यध्यक्ष आणि कॉंग्रेस पक्षाचे ज्येषठ नगरसेवक श्री. प्रफुल्ल पाटील यांच्यावर ८ मे रोजी भ्याड हल्ला झाला. आणि त्यामध्ये त्यांच दुःखद निधन झाल प्रथमतः भ्याड हल्ल्याच माझ्या पक्षातर्फे आणि माझ्या सदस्यांतर्फे मी त्याचा निषेध करतो. जो हल्ला खर तर त्यांच्यावर नव्हता हा हल्ला पूर्ण शहरावर होता. की, अशा प्रकारचा एक हल्ला पूर्ण शहरावर होता की, अशा प्रकारच एक व्यक्तिमत्व ज्याने प्रतिकुल परिस्थितीशी झगडून आपल शिक्षण पूर्ण केल. आपल्या कामधंद्यामध्ये यश मिळवल. आणि ते यश मिळवल्यानंतर या शहरामध्ये जे दायीत्व आहे. ते अभिनव शिक्षण संस्था सारखी शेतकरी संस्था स्थापन करून त्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाल, नविन नविन फॅकल्टीज त्यांनी सुरू केल्या. फार्मसि, बि-एड, डि.एड, इंजिनियरिंग, त्यांच पुढच स्वप्न होत ते म्हणजे पायलेट ट्रेनिंग स्कुल चालू करण्याच होत. या शहरामध्ये एम.बी.ए. अशा प्रकारच्या फॅकल्टीज त्यांनी चालू केल्या. संपूर्ण जागामधून विविध देशांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. कितीतरी प्रकारच्या त्यांना डॉक्टरेट त्यांना मिळालेल आहे. नेपाळ गर्व्हरमेन्ट कडून त्यांना डॉक्टरेट मिळणार होते. आणि त्याचा पुढील काही महिन्यात होणारच होता. परंतु, त्या अगोदरच हे भ्याड हल्ल्याच कृत या शहरामध्ये घडल आणि त्यामध्ये प्रफुल्ल पाटील सारखा एक अभ्यासु नगरसेवक, जिज्ञासू नगरसेवक यांच निधन झाल. त्याबद्दल स्टॅण्डींग कमिटी च्या सर्व सदस्यांतर्फे मी त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी. आणि त्यांच्या कुटूंबियांना या प्रसंगातुन बाहेर पडण्याच बळ मिळाव. अशी प्रार्थना करतो. आणि त्यांच्यासाठी २ मिनिट आपण त्यांना श्रध्दांजली वहावी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपने राजस्थान के पूर्व मुख्यमंत्री तथा अपने पूर्व उप राष्ट्रपती राष्ट्रीय नेते श्री. भैरवसिंग शेखावत का जो दुःखत निधन हुआ उसका भी मे शोकप्रस्ताव मांडता हूँ।

**हेलन गोविंद :-**

सन्मा. आमदार वसंत डावखरे साहेब यांच्या पत्निचे निधन झालेले आहे तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो. असा मी प्रस्ताव मांडत आहे. आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी संज्याव नुनिस यांच्या मुलाच सुध्दा निधन झाले तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो असा मी प्रस्ताव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी २ मिनिट जागेवर उभे राहून मृतात्मास श्रध्दांजली वहायची.

**दुःखवठा ठराव क्र. १७ :-**

कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने खऱ्या अर्थाने या शहराचे नाव रोषण केले. महानगरपालिकेची मा. महासभा असू दे किंवा इतर कार्यक्षेत्र असू दे त्यांचा जो दांडगा अभ्यास आणि मा. महासभेमध्ये प्रत्येक विषया विषयी असलेले सखोल ज्ञान, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष आणि कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल पाटील ह्यांच्यावर दि. ८ मे २०१० रोजी भ्याड हल्ला झाला आणि त्यामध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. प्रथमतः भ्याड हल्ल्याचे माझ्या पक्षातर्फे आणि सर्व सदस्यांतर्फे मी त्याचा निषेध करतो. हा हल्ला खरं तर त्यांच्यावर नव्हता तर पूर्ण शहरावर तो हल्ला होता. अशाप्रकारचे एक व्यक्तीमत्व, ज्याने प्रतिकूल परिस्थितीशी झगडून आपले शिक्षण पूर्ण केले. आपल्या कामधंद्यामध्ये यश मिळवले आणि ते यश मिळवल्यानंतर या शहराबद्दल जे दायीत्व आहे, ते अभिनव शिक्षण संस्था सारखेच शेतकरी संस्था स्थापन करुन त्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले त्यांनी फार्मसी, बी.ए., डी.एड., इंजिनिअरिंग सारख्या नविन फॅकल्टीस सुरु केल्या. पायलट ट्रेनिंग स्कुल चालु करण्याचे त्यांचे पुढील स्वप्न होते. या शहरामध्ये त्यांनी एम.बी.ए. अशासारख्या फॅकल्टीज चालु केल्या. संपूर्ण जगामधून विविध देशांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. किती तरी प्रकारच्या त्यांना डॉक्टरेट पदव्या मिळालेल्या आहेत. नेपाळ गर्व्हमेंटकडून त्यांना डॉक्टरेट पदवी मिळणार होती आणि त्यांचा सत्कार पुढील काही महिन्यातच होणार होता. परंतु, त्या अगोरदरच हे भ्याड कृत्य या शहरामध्ये घडले आणि त्यामध्ये प्रफुल्ल पाटील सारख्या एक अभ्यासू, जिज्ञासु नगरसेवकाचे दुःखद निधन झालेले आहे. त्याबद्दल स्थायी समितीच्या सर्व सदस्यांतर्फे मी त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि त्यांच्या कुटूंबियांना या प्रसंगातून बाहेर पडण्यास बळ मिळावं अशी प्रार्थना करुन दुःखवठा ठराव मांडतो. तसेच राजस्थानचे पूर्व उपराष्ट्रपती श्री. भैरवसिंग शेखावत यांचेसुध्दा निधन झालेले आहे तसेच सन्मा. आमदार वसंत डावखरे साहेब यांच्या पत्नीचे निधन झालेले आहे तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो. असा मी प्रस्ताव मांडत आहे. आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी संज्याव नुनिस यांच्या मुलाचे सुध्दा निधन झाले तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो असा मी प्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत        अनुमोदक :- श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**